Epaper

दैनिक जन सम्राट टाईम्स

सत्याचे प्राईम्स

डिजिटल क्रांतीची धगधगती मशाल

MSME - MH-33 -0714843

मुख्य संपादक: मुकुंदराव शामराव नंन्नवरे

जवाहर नगरातील नागरिकांचा नगरपरिषदेवर संताप!

(पान २ वर)



। शुक्रवार, दि. २५ सप्टेंबर २०२६ । वर्ष १ । अंक १६६ । पाने ४ । Title Code - T/MH/2026/0422/5204/1306 DIGITAL EDITION

मागील वर्षीच्या मदत पॅकेजवरून रोहित पवार आक्रमक; मुख्यमंत्र्यांनी स्पष्टीकरण देण्याची मागणी

35 हजार कोटींचं पॅकेज, दिले फक्त 15 हजार कोटी?

जन सम्राट टाईम्स

मुंबई । राज्यातील दुष्काळसदृश परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर शेतकरी मदतीचा मुद्दा पुन्हा ऐरणीवर आला आहे. सरकारकडून शेतकऱ्यांना यापूर्वी मोठ्या प्रमाणात मदत करण्यात आल्याचा दावा केला जात असताना, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी या दाव्यांवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. सोशल मीडिया पोस्टच्या माध्यमातून त्यांनी मागील वर्षी जाहीर करण्यात आलेले मदत पॅकेज, हेक्टरी मदत आणि पीकविम्याच्या रकमेबाबत काही आकडे मांडत सरकारकडे स्पष्टीकरणाची मागणी केली आहे.

फडणवीस सरकारच्या शेतकरी मदतीवर रोहित पवारांचा सवाल

ऑक्टोबर २०२५ मध्ये अतिवृष्टी आणि पुरामुळे बाधित शेतकऱ्यांसाठी राज्य सरकारने ₹३१,६२८ कोटींचे मदत पॅकेज जाहीर केले होते. या पॅकेजमध्ये पीक नुकसान, जमीन खरडून जाणे, पशुधन आणि अन्य नुकसानीसाठी विविध प्रकारच्या मदतीचा समावेश होता. सरकारच्या घोषणेनंतर मदतीचे वितरण टप्प्याटप्प्याने करण्यात आले. मात्र, जाहीर केलेली रक्कम आणि प्रत्यक्ष शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा झालेली मदत यामध्ये मोठी तफावत असल्याचा दावा रोहित पवार यांनी केला आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार, मागील वर्षी सुमारे ३२ हजार कोटी रुपयांचे पॅकेज जाहीर करण्यात आले; मात्र प्रत्यक्षात १५ हजार



कोटी रुपयांपेक्षाही कमी रक्कम मिळाल्याचा त्यांचा दावा आहे. रोहित पवार यांनी हेक्टरी १७,५०० रुपयांच्या मदतीच्या घोषणेचाही मुद्दा उपस्थित केला आहे. ही मदत जाहीर करण्यात आली असली तरी प्रत्यक्षात शेतकऱ्यांना त्याचा किती लाभ मिळाला, याबाबत सरकारने स्पष्ट आकडेवारी द्यावी, अशी मागणी त्यांनी केली आहे. दरम्यान, मागील वर्षीच्या मदत पॅकेजमध्ये कोरडवाहू शेतकऱ्यांसाठी हेक्टरी ₹१८,५००, हंगामी सिंचनाखालील जमिनीसाठी ₹२७,००० आणि पूर्ण सिंचनाखालील जमिनीसाठी ₹३२,००० मदतीची तरतूद करण्यात आली होती, अशी माहिती त्यावेळी प्रसिद्ध झालेल्या वृत्तांत देण्यात आली होती. पीकविमा योजनेवरही रोहित पवार यांनी प्रश्न उपस्थित केअंदाजानुसार राज्यातील शेतकऱ्यांना ५ ते ७ हजार कोटी रुपये पीकविमा भरपाई मिळणे अपेक्षित होते; मात्र प्रत्यक्षात सुमारे १,९०० कोटी रुपये मिळाल्याचा त्यांचा दावा आहे. केंद्र, राज्य आणि शेतकरी यांच्या माध्यमातून विमा कंपन्यांना सुमारे २,३९४ कोटी रुपयांचा विमा हप्ता जमा झाला असल्याचे सांगत, त्यापेक्षा कमी रक्कम शेतकऱ्यांना मिळाल्याचा सवाल त्यांनी उपस्थित केला आहे. मराठवाड्याच्या संदर्भातही त्यांनी वेगळी आकडेवारी मांडली. मुख्यमंत्र्यांच्या हिशोबाने या भागातील शेतकऱ्यांना सुमारे ५,२०० कोटी रुपयांची पीकविमा भरपाई मिळायला हवी होती; मात्र प्रत्यक्षात केवळ सुमारे १,५०० कोटी रुपये मिळाल्याचा दावा पवार यांनी केला आहे. हे आकडे त्यांच्या सोशल मीडिया पोस्टमधील दावे आहेत.

‘पीकविम्यातील ट्रिगर काढले’

पीकविमा योजनेतील काही महत्त्वाचे ‘ट्रिगर’ काढण्यात आल्याचा आरोपही रोहित पवार यांनी केला आहे. सरकारने विमा कंपन्यांशी संगनमत केल्याचा आणि शेतकऱ्यांच्या हिताला धक्का पोहोचल्याचा आरोप करत त्यांनी मुख्यमंत्र्यांकडे स्पष्टीकरणाची मागणी केली. दरम्यान, केंद्राच्या अधिकृत माहितीनुसार महाराष्ट्रात PMFBY अंतर्गत २०२४-२५ मध्ये सुमारे ५,७७४.८ कोटी रुपयांचे दावे अदा झाल्याची नोंद आहे. त्यामुळे रोहित पवार यांनी मांडलेली आकडेवारी कोणत्या विशिष्ट हंगामाची, कालावधीची किंवा दाव्यांच्या टप्प्याची आहे, याची स्पष्टता आवश्यक आहे. राज्यात सध्या दुष्काळी परिस्थितीवरून सरकार आणि विरोधकांमध्ये आरोप-प्रत्यारोप सुरू असून, शेतकऱ्यांना प्रत्यक्ष किती मदत मिळाली आणि किती मदत प्रलंबित आहे.

दैनिक जन सम्राट टाईम्स सत्याचे प्राईम्स

उद्या अंक नाही

शुक्रवार, दिनांक 25 सप्टेंबर रोजी अनंत चतुर्दशीनिमित्त दैनिक जन सम्राट टाईम्सच्या कार्यालयास सुटी असल्यामुळे शनिवार, दिनांक 26 सप्टेबर रोजीचा अंक प्रसिद्ध होणार नाही. याची आमचे वाचक, जाहिरातदार, हितचिंतक यांनी नोंद घ्यावी.

- मुकुंदराव नंन्नवरे,
मुख्य संपादक

Selected

आठ वर्षात एकही नवे शांतता क्षेत्र नाही

मुंबई : ध्वनीप्रदूषण आणि डीजेच्या दणदणाटावरून नेहमी टीका होत असताना आणि नागरीकरण वाढत असताना राज्यात केवळ ३,११२ शांतता क्षेत्रे लागू असून २०१७ पासून एकही नवे शांतता क्षेत्र जाहीर झालेले नाही. अजित सिंग आणि गणेश बोऱ्हाडे यांनी पुणे येथील हरित लवादात याचिका दाखल केली असून, ध्वनी प्रदूषणाच्या नियमनाबाबत सुनिश्चित कार्यपद्धती (SOP) बनवावी, अशी मागणी केली आहे.

६२० पैकी १५० अधिकारी अजूनही मंत्र्यांकडे; शिंदे कार्यालयाकडून ३० कर्मचारी सोडण्यास नकार?

जन सम्राट टाईम्स

नाशिक। प्रतिनिधी: तोंडी आणि उसनवारी तत्त्वावर मंत्र्यांकडे कार्यरत असणाऱ्या अधिकारी, कर्मचाऱ्यांना त्यांच्या मुळ विभागात पाठविण्याच्या मुख्य सचिवांच्या आदेशाला महिना लोटल्यानंतरही एक तृतीयांश अधिकारी अजूनही सबंधित मंत्र्याकडे तळ ठोकून बसल्याचे आढळून आले आहे. तर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आपल्याकडील कर्मचाऱ्यांना रिक्त जागांवर समायोजित करण्याची मागणी केली आहे. उसनवारी पद्धतीने आणि तोंडी आदेशाने मंत्री आस्थापनेला चिकटून बसलेल्या अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या नेमणुका रद्द करण्याबाबत मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांनी २५ ऑगस्ट रोजी आदेश काढले होते. त्यानुसार विविध मंत्र्यांकडे उसनवारीवर काम करणाऱ्या ६२० अधिकारी-कर्मचाऱ्यांपैकी जवळपास १५० अधिकारी कर्मचारी अजूनही मंत्र्यांकडे कार्यरत असल्याची माहिती सूत्रांनी दिली. विशेष म्हणजे काही बहुतांश मंत्र्यांनी आपल्याकडील कर्मचारी कमी केले असले तरी अजूनही उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या कार्यालयासाठी ७२ पदे मंजूर असून त्यांच्याकडे ३० अतिरिक्त कर्मचारी कार्यरत असून यातील एकही कर्मचारी सोडण्यास शिंदे यांच्या कार्यालयाने नकार दिल्याचे समजते. उपमुख्यमंत्री कार्यालयासाठी मंजूर पदांपैकी १८ पदे रिक्त असून त्यावर पदांवर या अधिकाऱ्यांना समायोजित करण्याची मागणी उपमुख्यमंत्री कार्यालयाने केली आहे. त्यानुसार धोरणात बसणाऱ्या अधिकाऱ्यांचे समोयोजन केले जाणार असून अन्य कर्मचाऱ्यांना परत पाठवावे लागणार आहे.उपमुख्यमंत्री सुनेत्राताई पवार यांच्या कार्यालयात केवळ दोन अतिरिक्त कर्मचारी आढळून आले.विशेष म्हणजे



आरोग्यमंत्री प्रकाश आबीटकर यांच्या कार्यालयासाठी १६ पदांची मंजूरी असताना तेथे तब्बल ७० अधिकारी- कर्मचारी उसनवारीवर काम करीत असल्याचे आढळून आले असून त्यांना परत पाठविण्यात आल्याचेही सूत्रांनी सांगितले. तोंडी आणि उसनवारी तत्त्वावर मंत्र्यांकडे कार्यरत असणाऱ्या अधिकारी, कर्मचाऱ्यांना त्यांच्या मुळ विभागात पाठविण्याच्या मुख्य सचिवांच्या आदेशाला महिना लोटल्यानंतरही एक तृतीयांश अधिकारी अजूनही सबंधित मंत्र्याकडे तळ ठोकून बसल्याचे आढळून आले आहे. तर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आपल्याकडील कर्मचाऱ्यांना रिक्त जागांवर समायोजित करण्याची मागणी केली आहे.

उसनवारी पद्धतीने आणि तोंडी आदेशाने मंत्री आस्थापनेला चिकटून बसलेल्या अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या नेमणुका रद्द करण्याबाबत मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांनी २५ ऑगस्ट रोजी आदेश काढले होते. त्यानुसार विविध मंत्र्यांकडे उसनवारीवर काम करणाऱ्या ६२० अधिकारी- कर्मचाऱ्यांपैकी जवळपास १५० अधिकारी कर्मचारी अजूनही मंत्र्यांकडे कार्यरत असल्याची माहिती सूत्रांनी दिली. विशेष म्हणजे काही बहुतांश मंत्र्यांनी आपल्याकडील कर्मचारी कमी केले असले तरी अजूनही उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या कार्यालयासाठी ७२ पदे मंजूर असून त्यांच्याकडे ३० अतिरिक्त कर्मचारी कार्यरत असून यातील एकही कर्मचारी सोडण्यास शिंदे यांच्या कार्यालयाने नकार दिल्याचे समजते. उपमुख्यमंत्री कार्यालयासाठी मंजूर पदांपैकी १८ पदे रिक्त असून त्यावर पदांवर या अधिकाऱ्यांना समायोजित करण्याची मागणी उपमुख्यमंत्री कार्यालयाने केली आहे. त्यानुसार धोरणात बसणाऱ्या अधिकाऱ्यांचे समोयोजन केले जाणार असून अन्य कर्मचाऱ्यांना परत पाठविण्यात आल्याचेही सूत्रांनी सांगितले. तोंडी आणि उसनवारी तत्त्वावर मंत्र्यांकडे कार्यरत असणाऱ्या अधिकारी, कर्मचाऱ्यांना त्यांच्या मुळ विभागात पाठविण्याच्या मुख्य सचिवांच्या आदेशाला महिना लोटल्यानंतरही एक तृतीयांश अधिकारी अजूनही सबंधित मंत्र्याकडे तळ ठोकून बसल्याचे आढळून आले आहे. तर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आपल्याकडील कर्मचाऱ्यांना रिक्त जागांवर समायोजित करण्याची मागणी केली आहे.

उसनवारी पद्धतीने आणि तोंडी आदेशाने मंत्री आस्थापनेला चिकटून बसलेल्या अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या नेमणुका रद्द करण्याबाबत मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांनी २५ ऑगस्ट रोजी आदेश काढले होते. त्यानुसार विविध मंत्र्यांकडे उसनवारीवर काम करणाऱ्या ६२० अधिकारी- कर्मचाऱ्यांपैकी जवळपास १५० अधिकारी कर्मचारी अजूनही मंत्र्यांकडे कार्यरत असल्याची माहिती सूत्रांनी दिली. विशेष म्हणजे काही बहुतांश मंत्र्यांनी आपल्याकडील कर्मचारी कमी केले असले तरी अजूनही उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या कार्यालयासाठी ७२ पदे मंजूर असून त्यांच्याकडे ३० अतिरिक्त कर्मचारी कार्यरत असून यातील एकही कर्मचारी सोडण्यास शिंदे यांच्या कार्यालयाने नकार दिल्याचे समजते. उपमुख्यमंत्री कार्यालयासाठी मंजूर पदांपैकी १८ पदे रिक्त असून त्यावर पदांवर या अधिकाऱ्यांना समायोजित करण्याची मागणी उपमुख्यमंत्री कार्यालयाने केली आहे. त्यानुसार धोरणात बसणाऱ्या अधिकाऱ्यांचे समोयोजन केले जाणार असून अन्य कर्मचाऱ्यांना परत पाठविण्यात आल्याचेही सूत्रांनी सांगितले. विशेष म्हणजे आरोग्यमंत्री प्रकाश आबीटकर यांच्या कार्यालयासाठी १६ पदांची मंजूरी असताना तेथे तब्बल ७० अधिकारी- कर्मचारी उसनवारीवर काम करीत असल्याचे आढळून आले असून त्यांना परत पाठविण्यात आल्याचेही सूत्रांनी सांगितले.

रत्नागिरी विमानतळाच्या उड्डाणाला पुन्हा ‘ब्रेक’!

जन सम्राट टाईम्स

रत्नागिरी । प्रतिनिधी: रत्नागिरी जिल्ह्याच्या विकासाला नवी दिशा देणाऱ्या विमानतळाचे काम अंतिम टप्प्यात पोहोचल्याचे सांगितले जात असतानाच, प्रत्यक्ष विमानसेवा सुरू होण्याच्या मार्गात पुन्हा अडथळे उभे राहिले आहेत. पालकमंत्री उदय सामंत यांनी जुलै महिन्यात येत्या तीन महिन्यांत रत्नागिरी विमानतळावरून पहिले विमान उड्डाण करेल, अशी घोषणा केली होती. त्यानुसार ऑक्टोबरचा मुहूर्तही निश्चित मानला जात होता. मात्र, आता हा मुहूर्तही टळण्याची शक्यता निर्माण झाली आहे. काही तांत्रिक अडचणी आणि विमानतळासाठी आवश्यक अतिरिक्त जागेचा प्रश्न अद्याप निकाली निघालेला नसल्याने रत्नागिरीकरांचे विमानसेवेचे स्वप्न पुन्हा लांबणीवर पडण्याची चिन्हे आहेत. भारतीय तटरक्षक दल आणि महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी (एमएडीसी) यांच्यात झालेल्या सामंजस्य कराराच्या कार्यक्रमात पालकमंत्री उदय सामंत यांनी रत्नागिरी विमानतळ तीन महिन्यांत उड्डाणासाठी सज्ज होईल, असे जाहीर केले होते. त्यामुळे रत्नागिरीकरांच्या अपेक्षा उंचावल्या होत्या. मात्र, प्रत्यक्षात प्रकल्प अंतिम टप्प्यात पोहोचूनही विमानसेवा सुरू करण्यासाठी आवश्यक बाबींची पूर्तता अद्याप झालेली नसल्याचे



चित्र आहे. त्यामुळे ‘तीन महिन्यांत उड्डाण’ या घोषणेचे पुढे काय झाले, असा सवाल आता उपस्थित होत आहे. विमानतळाच्या कामात काही तांत्रिक अडचणी असल्याचे सांगितले जात असून, त्यात अतिरिक्त जागेचा प्रश्नही महत्त्वाचा ठरत आहे. विमानतळ परिसरातील काही घरांचा अडथळा दूर करणे आवश्यक असल्याचे सांगितले जात आहे. संबंधित जागा उपलब्ध झाल्याशिवाय काही महत्त्वाची कामे पूर्ण होणार नसल्याने विमानसेवा सुरू करण्याच्या वेळापत्रकावर त्याचा थेट परिणाम होण्याची शक्यता आहे.रत्नागिरी विमानतळाच्या अत्याधुनिक टर्मिनल इमारतीचे सुमारे ९० टक्के काम पूर्ण झाल्याचे सांगण्यात येत आहे. उर्वरित कामे वेगाने सुरू आहेत. विमानांच्या सुरक्षित पार्किंगसाठी आवश्यक असलेल्या ॲप्रनचे कामही अंतिम टप्प्यात आहे. टर्मिनल इमारत, प्रवासी सुविधा, सुरक्षा यंत्रणा आणि अन्य पायाभूत सुविधांची उभारणी सुरू असताना विमानसेवा सुरू होण्याच्या अंतिम प्रक्रियेत मात्र अडथळे कायम आहेत. टर्मिनल इमारतीतून प्रवाशांना थेट धावपट्टीकडे जाता यावे, यासाठी सुरक्षाभिंतीचा काही भाग हटविण्याचे तांत्रिक कामही हाती घेण्यात आले आहे. या कामामुळे टर्मिनल आणि रनवे यांच्यातील प्रवासी मार्ग सुलभ होण्याची अपेक्षा आहे.

यापूर्वी सहा वेळा दुष्काळसदृश्य स्थिती

मुंबई : राज्यातील अनेक भागात पावसाने ओढ दिल्याने राज्य पुन्हा एकदा दुष्काळाच्या उंबरठ्यावर पोहोचले आहे. यंदाची परिस्थिती मात्र मागील दशकातील दुष्काळसदृश्य आणि दुष्काळी परिस्थितीपेक्षा अधिक गंभीर आहे. यापूर्वी दोन वेळा दुष्काळसदृश्य, एक वेळ तीव्र पाणी टंचाई, दोन वेळ अधिकृत दुष्काळ आणि एक वेळा मर्यादीत दुष्काळ जाहीर करण्यात आला होता. राज्यातील सुमारे २१ जिल्ह्यांमध्ये दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण होण्याची शक्यता व्यक्त होत आहे. पावसाच्या मोठ्या खंडामुळे खरीप पिकांना मोठा फटका बसला आहे.

डीजे, फटाके, लेझरवर बंदी; विसर्जन मिरवणुका काढायच्या कशा?



जन सम्राट टाईम्स

मुंबई| प्रतिनिधी: उच्च न्यायालयाने गणेशोत्सवासह सर्वधर्मीय उत्सव आणि मिरवणुकांमध्ये ध्वनी आणि वायू प्रदूषण रोखण्यासाठी सार्वजनिक ठिकाणांसह रस्त्यांवर फटाक्यांची आतशबाजी, डीजे, लेझर लाईटस्, बीम्सच्या वापरावर बंदी घालण्याचे आदेश दिले. मात्र राज्य सरकारने या संदर्भात कोणत्याही सूचना जाहीर न केल्यामुळे शासकीय यंत्रणा, सार्वजनिक गणेशोत्सवांमध्ये संभ्रम निर्माण झाला आहे. एकूणच संभ्रम, तणाव आणि कारवाईच्या भीतीचे पडसाद अनंत चतुर्दशीच्या दिवशी विसर्जन मिरवणुकांमध्ये उमटण्याचे, तसेच मंडळाचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि पोलीस यांच्यामध्ये संघर्ष होण्याची दाट शक्यता आहे. मुंबईसह संपूर्ण महाराष्ट्रात गणेशोत्सव मोठ्या धूमधडाक्यात साजरा झाला. मुंबईमधील काही गणेशोत्सव मंडळांच्या गणेशमूर्तीचे दर्शन घेण्यासाठी महाराष्ट्रच नव्हे तर आसपासच्या राज्यातून भाविक मोठ्या संख्येने येतात.

त्यामुळे गिरगाव, लालबाग, परळ आदी भागात प्रचंड गर्दी होते. त्याचा परिणाम वाहतुकीवरही होतो. तसेच गणेश आगमन आणि विसर्जन मिरवणुकांमध्ये कर्कश्य आवाजात वाजविण्यात येणारी वाद्ये, फटाक्यांची आतशबाजी आदींमुळे नागरिकांना त्रास होतो. केवळ नागरिकांना त्रास नव्हे तर ध्वनी, वायू प्रदुषणही होते. ही बाब लक्षात घेऊन मुंबई उच्च न्यायालयाने सार्वजनिक ठिकाणांसह रस्त्यांवर फटाक्यांची आतशबाजी, डीजे, लेझर लाईटस्, बीम्सच्या वापरावर बंदी घालण्याचे आदेश दिले आहेत. ध्वनीची निर्धारित मर्यादा पाळणी, ध्वनीमापक यंत्रे आणि आवाज मर्यादेबाबतच्या अटींचे उल्लंघन झाल्यास संबंधित मंडळांकडून किमान एक लाख रुपये सुरक्षा ठेव घेण्याचे निर्देश दिले आहेत. मात्र मुंबई उच्च न्यायालयाने आदेश दिल्यानंतर राज्य सरकारकडून सूचना जारी होणे अपेक्षित होते. मात्र सरकारकडून कोणतेही निवेदन वा सूचना न देण्यात आल्यामुळे शासकीय यंत्रणा बुचकळ्यात पडल्या आहेत. अनंत चतुर्दशीनिमित्त शुक्रवार, २५ सप्टेंबर रोजी सकाळपासून मुंबईत गणेश विसर्जन मिरवणुकांना सुरुवात होईल.

बेन्जो पार्टी, नाशिक बाजा, टोल वाद्यांचा समावेश असलेल्या ढोल-ताशाच्या गजरात विसर्जन मिरवणुका विसर्जनस्थळांकडे मार्गस्थ होण्यास सुरुवात होईल. काही मिरवणुकांमध्ये ध्वनिक्षेपकांचाही वापर करण्यात येतो. तसेच विसर्जन मिरवणुकांचे स्वागत करण्यासाठी स्थानिक नेते मंडळी, समाजसेवक जागोजागी मंडप उभारतात.

या मंडपांमध्येही ध्वनिक्षेपकांचा वापर करण्यात येतो. न्यायालयाने दिलेल्या आदेशांच्या अमलबजावणीबाबत आता सर्वच जण संभ्रमात पडले आहेत. मोठा आवाज करणाऱ्या वाद्यांचा मिरवणुकीत समावेश करायचा की नाही, नव्या आदेशानुसार ध्वनिक्षेपकाच्या वापरासाठी एक लाख रुपये सुरक्षा ठेव रक्कम कुठे भरायची, कारवाई नेमकी कोण करणार असे अनेक प्रश्न सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाना गुरूवारी पडले होते.

जन सम्राट टाईम्स अँकर न्यूज

‘राहुल गांधींना राजकीय ज्ञान कमी’; निवडणूक आयोगाच्या मुद्द्यावर भाजपचा पलटवार

ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याची राहुल गांधींची मागणी;त्रिवेदींकडून आरोप फेटाळत SIR प्रक्रियेचे समर्थन

जन सम्राट टाईम्स

नवी दिल्ली । प्रतिनिधी: निवडणूक आयोगाच्या विशेष सखोल मतदारयादी पुनरिक्षणाच्या (SIR) प्रक्रियेवरून काँग्रेस आणि भाजपमध्ये संघर्ष तीव्र झाला आहे. लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याची मागणी करत निवडणूक प्रक्रियेवर गंभीर प्रश्न उपस्थित केले. त्यानंतर भाजपचे राष्ट्रीय प्रवक्ते तथा राज्यसभा खासदार सुधांशू त्रिवेदी यांनी पत्रकार परिषद घेत राहुल गांधींच्या आरोपांना प्रत्युत्तर दिले. राहुल गांधी यांनी गुरुवारी पत्रकार परिषदेत देशातील निवडणूक प्रक्रिया आणि मतदारयादीच्या विश्वासार्हतेबाबत चिंता व्यक्त केली. २०२४ची लोकसभा निवडणूक तसेच त्यानंतरच्या काही विधानसभा निवडणुकांमध्ये गैरप्रकार झाल्याचा दावा त्यांनी केला. निवडणूक आयोगाच्या कामकाजावर प्रश्न उपस्थित करत ज्ञानेश कुमार यांनी तातडीने राजीनामा द्यावा, अशी मागणी त्यांनी केली. राहुल गांधी यांनी सत्ताविरोधी लाटेचा मुद्दाही उपस्थित केला. भारताच्या राजकारणात सरकारविरोधी जनमत बदलाची प्रक्रिया अनेकदा दिसून आली आहे. माजी पंतप्रधान इंदिरा गांधी यांचे उदाहरण देत त्यांनी बांगलादेश युद्धानंतर त्यांच्या लोकप्रियतेनंतरही काही काळात सत्ताविरोधी लाट निर्माण झाल्याचे सांगितले. मात्र सध्याच्या राजकारणात पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्याविरोधात अशी



लाट का दिसत नाही, असा सवाल त्यांनी उपस्थित केला. ‘ECI मध्ये मतभेद असल्याचा पुरावा कुठे?’ राहुल गांधींच्या आरोपांवर भाजपचे राष्ट्रीय प्रवक्ते सुधांशू त्रिवेदी यांनी जोरदार प्रत्युत्तर दिले. निवडणूक आयोगातील आयुक्तांमध्ये मतभेद असल्याचा दावा करण्यासाठी ठोस पुरावे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. माध्यमांमध्ये प्रसिद्ध झालेल्या वृत्ताच्या आधारेच हे आरोप करण्यात येत असल्याचा दावा त्रिवेदी यांनी केला. द इंडियन एक्स्प्रेसने प्रसिद्ध केलेल्या वृत्ताचा संदर्भ देत त्रिवेदी यांनी त्या वृत्तात निवडणूक आयुक्तांची थेट प्रतिक्रिया किंवा अधिकृत प्रतिक्रिया नसल्याचा मुद्दा उपस्थित केला. आयोगातील निर्णय बहुमताने घेतले जातात, असेही त्यांनी स्पष्ट केले. SIR प्रक्रियेच्या अधिकारावर भाजपचा दावा विशेष सखोल मतदारयादी पुनरिक्षण अर्थात SIR करण्याचा अधिकार निवडणूक आयोगाला असल्याचे त्रिवेदी यांनी सांगितले. REPRESENTATION OF THE PEOPLE ACT, 1950 मधील तरतुदींचा दाखला देत त्यांनी आयोगाच्या अधिकारांचे समर्थन केले. सर्वोच्च न्यायालयानेही SIR प्रक्रियेबाबत आयोगाच्या अधिकारांना मान्यता दिल्याचा दावा त्यांनी केला. राहुल गांधींच्या राजकीय भूमिकेवरही त्रिवेदी यांनी टीका केली. काँग्रेसच्या निवडणूक कामगिरीचा संदर्भ देत त्यांनी राहुल गांधींवर राजकीय समज कमी असल्याचा आरोप केला. विविध राज्यांमधील काँग्रेसच्या निवडणूक पराभवांसाठी पक्षाच्या राजकीय रणनीतीकडे पाहण्याची गरज असल्याचेही त्यांनी म्हटले. त्यांच्या वक्तव्यांत राहुल गांधींच्या निवडणूक विजयांबाबतही टीका करण्यात आली. निवडणूक आयोगाच्या भूमिकेकडे लक्ष दरम्यान, मतदारयादीतील बदल, SIR प्रक्रिया आणि निवडणूक आयोगाच्या निर्णयप्रक्रियेवरून सुरू झालेला हा राजकीय वाद आता अधिक तीव्र झाला आहे. एका बाजूला राहुल गांधी निवडणूक प्रक्रियेच्या पारदर्शकतेवर प्रश्न उपस्थित करत आहेत, तर दुसरीकडे भाजप आयोगाची प्रक्रिया कायदेशीर असल्याचे सांगत काँग्रेसच्या आरोपांना विरोध करत आहे. या वादात निवडणूक आयोगाची अधिकृत भूमिका, उपलब्ध मतदारयादीची आकडेवारी आणि न्यायालयीन प्रक्रियेत झालेल्या निर्णयांकडे पुढील काळात विशेष लक्ष राहणार आहे.

जळगाव दुष्काळग्रस्त घोषित करण्यासाठी मुख्यमंत्र्यांची भेट घेणार; आमदार राजूमामा भोळे

जळगाव तालुक्यातील दुष्काळसदृश भागाची पाहणी; पिकांचे मोठे नुकसान

जन सम्राट टाईम्स



जळगाव। प्रतिनिधी : पावसाने गेल्या दीड महिन्यापासून ओढ दिल्याने जळगाव तालुक्यातील अनेक भागांमध्ये खरीप पिकांवर संकट ओढवले आहे. सोयाबीन, मका आणि उडीद पिकांना मोठा फटका बसल्याच्या पार्श्वभूमीवर आमदार सुरेश भोळे (राजूमामा) यांनी दुष्काळसदृश भागाची पाहणी करून शेतकऱ्यांशी संवाद साधला. यावेळी त्यांनी प्रत्यक्ष शेतशिवारात जाऊन पिकांची स्थिती जाणून घेतली तसेच शेतकऱ्यांच्या अडचणी ऐकून घेतल्या. पावसाअभावी अनेक ठिकाणी पिकांची वाढ खुंटली असून काही भागांत उभी पिके करपण्याच्या स्थितीत असल्याचे शेतकऱ्यांनी सांगितले. त्यामुळे खरीप हंगामातील उत्पादनावर परिणाम होण्याची शक्यता असून शेतकऱ्यांसमोर आर्थिक संकट उभे राहण्याची चिंता व्यक्त होत आहे. आमदार भोळे यांनी पाहणीदरम्यान शेतकऱ्यांकडून पिकांचे नुकसान, पावसाची स्थिती आणि शेतीसमोरील अडचणींची माहिती घेतली. शेतकऱ्यांनी पावसाअभावी निर्माण झालेल्या परिस्थितीची व्यथा आमदारांसमोर मांडत शासनाकडून तातडीच्या मदतीची मागणी केली. दरम्यान, जळगाव जिल्हा दुष्काळग्रस्त घोषित करावा, या मागणीसाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेणार असल्याचे आमदार राजूमामा भोळे यांनी सांगितले. जळगाव तालुक्यासह जिल्ह्यातील पावसाची स्थिती, पिकांचे झालेले नुकसान आणि शेतकऱ्यांसमोरील अडचणी मुख्यमंत्र्यांच्या निदर्शनास आणून देत आवश्यक मदतीसाठी पाठपुरावा करण्यात येणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. दरम्यान, राज्यात सध्या दुष्काळसदृश परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर सरकारकडून नुकसानग्रस्त भागांचा आढावा, पीक नुकसानीचे पंचनामे आणि मदत उपाययोजनांची प्रक्रिया सुरू आहे. मुख्यमंत्री फडणवीस यांनी प्रभावित भागांबाबत दुष्काळ व्यवस्थापन संहितेनुसार निर्णय घेण्याचे संकेत दिले असून, २५ सप्टेंबरपर्यंत संबंधित शासन निर्णय काढण्याची माहितीही समोर आली आहे. शेतकऱ्यांना मदतीची अपेक्षा पावसाच्या प्रदीर्घ खंडामुळे पिकांचे नुकसान झाल्याने शेतकऱ्यांना आर्थिक मदत, पीक नुकसानीचे पंचनामे आणि दुष्काळी उपाययोजनांची अपेक्षा आहे. जळगाव जिल्ह्यातील परिस्थितीही शासनाच्या पाहणी व मदत प्रक्रियेत गांभीर्याने विचारात घ्यावी, अशी भूमिका आमदार भोळे यांनी मांडली. पावसाने गेल्या दीड महिन्यापासून ओढ दिल्याने जळगाव तालुक्यातील अनेक भागांमध्ये खरीप पिकांवर संकट ओढवले आहे. सोयाबीन, मका आणि उडीद पिकांना मोठा दुष्काळसदृश भागाची पाहणी करून शेतकऱ्यांशी संवाद साधला. यावेळी त्यांनी प्रत्यक्ष शेतशिवारात जाऊन पिकांची स्थिती जाणून घेतली तसेच शेतकऱ्यांच्या अडचणी ऐकून घेतल्या. पावसाअभावी अनेक ठिकाणी पिकांची वाढ खुंटली असून काही भागांत उभी पिके करपण्याच्या स्थितीत असल्याचे शेतकऱ्यांनी सांगितले.

एरंडोलमधील तीन सराईत गुन्हेगार जळगाव जिल्ह्यातून तडीपार

जन सम्राट टाईम्स

जळगाव : एरंडोल शहर व परिसरात दहशत निर्माण करणाऱ्या सराईत गुन्हेगारी प्रवृत्तीच्या तीन जणांविरुद्ध जळगाव पोलिसांनी प्रतिबंधात्मक कारवाई करत त्यांना एक वर्षासाठी संपूर्ण जळगाव जिल्ह्यातून हद्दपार केले आहे. पोलीस अधीक्षक श्रीकांत धिवरे यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली.

हद्दपार करण्यात आलेल्यांमध्ये टोळीप्रमुख शुभम कैलास महाजन (वय १८, रा. नागोबा मढी, एरंडोल), पवन प्रकाश मराठे (वय १९, रा. अमळनेर दरवाजा, एरंडोल) आणि शुभम उर्फ 'झिंग्या' दत्तात्रय पाटील (वय २५, रा. अमळनेर दरवाजा, एरंडोल) यांचा समावेश आहे. हद्दपारीचे आदेश बजावल्यानंतर संबंधितांना दोन दिवसांच्या आत जळगाव जिल्ह्याची हद्द सोडण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. पोलिसांच्या माहितीनुसार, संबंधित तिघांविरुद्ध एरंडोल पोलीस ठाण्यात गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल असून, या प्रकरणांमध्ये न्यायालयात दोषारोपपत्रही दाखल करण्यात आले आहे. मात्र, त्यानंतरही त्यांच्या कथित गुन्हेगारी हालचाली सुरू असल्याचे पोलिसांचे म्हणणे आहे. सन २०२६ मध्ये बेकायदेशीर जमाव जमवून दहशत निर्माण करणे तसेच मारहाणीच्या प्रकरणी गुन्हा क्रमांक ३८/२०२६ दाखल करण्यात आला होता. याशिवाय भारतीय नागरिक सुरक्षा संहिता कलम १२६ अन्वये प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आली होती. संबंधितांच्या कथित कारवायांमुळे परिसरातील कायदा-सुव्यवस्थेला तसेच नागरिकांच्या सुरक्षिततेला धोका निर्माण होत असल्याचे नमूद करून पोलिसांकडून हद्दपारीचा प्रस्ताव सादर करण्यात आला. या प्रस्तावासोबत दाखल गुन्हे, संबंधितांची गुन्हेगारी पार्श्वभूमी आणि इतर कागदपत्रांची तपासणी करण्यात आली. या प्रक्रियेनंतर पोलीस अधीक्षक श्रीकांत धिवरे यांनी तिघांना एक वर्षासाठी जळगाव जिल्ह्यातून हद्दपार करण्याचे आदेश जारी केले. एरंडोल शहर व परिसरातील कायदा-सुव्यवस्था कायम ठेवण्यासाठी तसेच गुन्हेगारी प्रवृत्तींना आळा घालण्यासाठी ही प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आल्याचे पोलिसांनी स्पष्ट केले.

जन सम्राट टाईम्स ब्रेक न्यूज

भडगावच्या देशमुख महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना दिन उत्साहात

जन सम्राट टाईम्स



भडगाव | प्रतिनिधी पाचोरा तालुका सहकारी शिक्षण संस्था संचलित सौ. रजनीताई नानासाहेब देशमुख कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, भडगाव येथे राष्ट्रीय सेवा योजना दिन उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. संजय भैसे होते. अध्यक्षीय मनोगतात डॉ. भैसे यांनी राष्ट्रीय सेवा योजना दिनाचे महत्त्व विशद केले. विद्यार्थ्यांनी शिक्षणासोबतच समाजसेवेत सक्रिय सहभाग घेऊन सामाजिक बांधिलकी जोपासावी, तसेच समाजातील विविध प्रश्नांविषयी संवेदनशील राहावे, असे आवाहन त्यांनी केले. एनएसएसच्या माध्यमातून व्यक्तिमत्त्व विकास कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते तथा राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ. बी. एस. भालेराव यांनी राष्ट्रीय सेवा योजनेचा इतिहास, भूमिका, ब्रीदवाक्य, एनएसएस बॅजचे महत्त्व तसेच राष्ट्रीय स्तरावरील विविध शिबिरांची माहिती दिली. नियमित व विशेष निवासी शिबिरांची कार्यपद्धती आणि स्वयंसेवकांची भूमिका याबाबतही त्यांनी सविस्तर मार्गदर्शन केले. राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये नेतृत्वगुण, सामाजिक जाणीव, स्वयंसेवेची भावना आणि राष्ट्रनिर्मितीची जाणीव विकसित होत असल्याचे डॉ. भालेराव यांनी सांगितले. एचआयव्ही-एड्सबाबत जनजागृती शासकीय ग्रामीण रुग्णालय, भडगाव येथील समुपदेशक नामदेव पाटील यांनी विद्यार्थ्यांना एचआयव्ही-एड्सविषयी मार्गदर्शन केले. एचआयव्ही-एड्सबाबत योग्य माहिती जाणून घेणे, समाजातील गैरसमज दूर करणे आणि जनजागृती करणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी ग्रामीण रुग्णालयातील प्रयोगशाळा तंत्रज्ञ रूपाली पाटील उपस्थित होत्या. कार्यक्रमादरम्यान पोस्टर स्कॅन करून राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवकांची नोंदणी करण्यात आली. त्यामुळे विद्यार्थ्यांना एनएसएसच्या विविध उपक्रमांमध्ये सहभागी होण्यासाठी आवश्यक नोंदणी प्रक्रिया पूर्ण करण्यात आली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. इंदिरा लोखंडे यांनी केले, तर आभार डॉ. एस. एन. हडोळतीकर यांनी मानले. कार्यक्रमास महाविद्यालयातील प्राध्यापक, कर्मचारी आणि राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवक मोठ्या संख्येने उपस्थित होते. पाचोरा तालुका सहकारी शिक्षण संस्था संचलित सौ. रजनीताई नानासाहेब देशमुख कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, भडगाव येथे राष्ट्रीय सेवा योजना दिन उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. संजय भैसे होते. सक्रिय सहभाग घेऊन सामाजिक बांधिलकी जोपासावी, तसेच समाजातील विविध प्रश्नांविषयी संवेदनशील राहावे, असे आवाहन त्यांनी केले. एनएसएसच्या माध्यमातून व्यक्तिमत्त्व विकास कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते तथा राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ. बी. एस. भालेराव यांनी राष्ट्रीय सेवा योजनेचा इतिहास, भूमिका, ब्रीदवाक्य, एनएसएस बॅजचे महत्त्व तसेच राष्ट्रीय स्तरावरील विविध शिबिरांची माहिती दिली.

गोदावरी इंजिनिअरिंग कॉलेजमध्ये विद्युत सुरक्षा व ऊर्जा बचतीचे धडे

जन सम्राट टाईम्स



जळगाव, | प्रतिनिधी: महावितरणच्या मार्गदर्शक सूचनांनुसार असोदा कक्षाच्या वतीने जळगाव-भुसावळ रोडवरील गोदावरी इंजिनिअरिंग कॉलेजमध्ये विद्यार्थ्यांसाठी विद्युत सुरक्षा, हरित ऊर्जा आणि ऊर्जा बचत या विषयांवर जनजागृती व प्रबोधन कार्यक्रम आयोजित करण्यात आला. भविष्यातील अभियंत्यांमध्ये विद्युत सुरक्षेबाबत सजगता निर्माण करण्यासोबतच ऊर्जा संवर्धनाचे महत्त्व पटवून देणे, हा या उपक्रमाचा प्रमुख उद्देश होता. कार्यक्रमात असोदा कक्षाचे कनिष्ठ अभियंता धिरज राजू तायडे यांनी इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंगच्या विद्यार्थ्यांना विद्युत सुरक्षेबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. विद्युत उपकरणांचा योग्य व सुरक्षित वापर, उपकरणांची हाताळणी करताना घ्यावयाची खबरदारी तसेच विजेपासून होणारे अपघात टाळण्यासाठी आवश्यक असलेल्या सुरक्षा उपायांची माहिती विद्यार्थ्यांना देण्यात आली. यावेळी विद्युत सुरक्षेबरोबरच वीज बचतीचे महत्त्वही स्पष्ट करण्यात आले. अनावश्यक विद्युत उपकरणे बंद ठेवणे, विजेचा काटकसरीने वापर करणे आणि उपलब्ध ऊर्जेचा कार्यक्षम पद्धतीने वापर करण्याच्या सवयी अंगीकारण्याचे आवाहन करण्यात आले. तसेच हरित ऊर्जा आणि सौरऊर्जेचा वाढता वापर याबाबतही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले. पारंपरिक ऊर्जास्रोतांवरील अवलंबित्व कमी करण्यासाठी सौरऊर्जेसारख्या पर्यायी व स्वच्छ ऊर्जास्रोतांचा वापर वाढविण्याची गरज यावेळी अधोरेखित करण्यात आली. ऊर्जा संवर्धन ही केवळ शासन किंवा संबंधित यंत्रणांची जबाबदारी नसून, प्रत्येक नागरिकाने त्यात योगदान देणे आवश्यक असल्याचे सांगण्यात आले. भविष्यातील अभियंते म्हणून विद्यार्थ्यांनी विद्युत सुरक्षेच्या नियमांचे पालन करण्यासोबतच सुरक्षित, कार्यक्षम आणि ऊर्जा-सक्षम तंत्रज्ञानाच्या वापराबाबत सजग राहावे, असा संदेश या कार्यक्रमातून देण्यात आला. कार्यक्रमास महाविद्यालयातील विद्यार्थी, संबंधित कर्मचारी तसेच महावितरणचे कर्मचारी उपस्थित होते. विद्यार्थ्यांनीही विद्युत सुरक्षा आणि ऊर्जा बचतीसंदर्भातील मार्गदर्शनाला सकारात्मक प्रतिसाद दिला.

दुष्काळाच्या झळा; जिल्हाधिकाऱ्यांचा थेट शेतशिवारात पाहणी दौरा!

संजयसिंह चव्हाण यांनी व्यथा जाणून घेत दिला धीर

जन सम्राट टाईम्स



परभणी,:। प्रतिनिधी: जिल्ह्यात निर्माण झालेल्या दुष्काळसदृश परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांच्या पिकांची वस्तुस्थिती जाणून घेण्यासाठी जिल्हाधिकारी संजयसिंह चव्हाण यांनी पुन्हा एकदा थेट शेतशिवारात जाऊन पाहणी केली. पावसाअभावी पिकांवर झालेला परिणाम प्रत्यक्ष पाहण्यासोबतच त्यांनी शेतकऱ्यांशी संवाद साधत त्यांच्या अडचणी, व्यथा आणि भविष्यातील शेतीबाबतच्या चिंता जाणून घेतल्या. जिंतूर तालुक्यातील कोक, बोरी, यलोनी तांडा, केहाळ तांडा, तसेच सेलू तालुक्यातील गिरगाव बु., निपाणी टाकळी आणि नागठाणा येथे जिल्हाधिकारी चव्हाण यांनी भेट देऊन विविध पिकांची पाहणी केली. पावसाअभावी पिकांची झालेली अवस्था, सद्यस्थिती आणि उत्पादनावर होणारा संभाव्य परिणाम याबाबत त्यांनी शेतकऱ्यांकडून प्रत्यक्ष माहिती घेतली.

यावेळी अनेक शेतकऱ्यांनी पिकांची बिकट परिस्थिती जिल्हाधिकाऱ्यांसमोर मांडली. पावसाची प्रतीक्षा, पिकांचे नुकसान आणि पुढील हंगामाबाबत निर्माण झालेली चिंता त्यांनी व्यक्त केली. शेतकऱ्यांच्या समस्या आस्थेवाईकपणे ऐकून घेत जिल्हाधिकारी चव्हाण यांनी 'शेतकऱ्यांनी चिंता करू नये, शासन आणि प्रशासन त्यांच्या पाठीशी आहे. असा धीर दिला. दुष्काळसदृश परिस्थितीचा गांभीर्याने आढावा घेतला जात असून, प्रत्यक्ष शेतशिवारात जाऊन पिकांची पाहणी करण्यासोबतच वस्तुस्थितीची माहिती संकलित केली जात आहे. परिस्थितीनुसार आवश्यक त्या उपाययोजना करण्यात येतील, असेही जिल्हाधिकाऱ्यांनी स्पष्ट केले. प्रशासनाकडून जिल्ह्यातील पावसाची स्थिती, पिकांची अवस्था आणि शेतकऱ्यांच्या अडचणींवर बारकाईने लक्ष ठेवण्यात येत आहे. प्रत्यक्ष बांधावर जाऊन पाहणी होत असल्याने शेतकऱ्यांच्या समस्यांची वास्तविक स्थिती प्रशासनापर्यंत पोहोचण्यास मदत होत आहे. या पाहणी दौऱ्यात उपविभागीय अधिकारी शैलेश लाहोटी, तहसीलदार शिवाजी मगर, शीतल कच्छवे, कृषी अधिकारी नितीन घुगे, गुलाब शिंदे, ग्रामसेवक प्रशांत खंदारे यांच्यासह तालुका कृषी अधिकारी, तलाठी आणि मोठ्या संख्येने शेतकरी उपस्थित होते.

योजना पाटील यांच्या हस्ते शीत शवपेटीचे लोकार्पण!

जन सम्राट टाईम्स

भडगाव । प्रतिनिधी: ओझर-अंतुर्ली विकास सोसायटीत भडगाव शेतकरी संघाच्या संचालक मंडळाच्या अध्यक्षा तथा माजी सभापती, नगरसेविका योजना पाटील यांच्या पुढाकारातून सामाजिक बांधिलकी आणि माणुसकीची जाणीव जपत शीत शवपेटीचे लोकार्पण करण्यात आले. 'सेवा संकल्प अभियान' अंतर्गत हा सामाजिक उपक्रम राबविण्यात आला. अंत्यसंस्कारापूर्वी मृतदेह सुरक्षित ठेवण्यासाठी शीत शवपेटीची आवश्यकता अनेकदा भासते. विशेषतः दूरवरून नातेवाईक येणे किंवा अंत्यसंस्काराला विलंब होणे अशा परिस्थितीत ही सुविधा नागरिकांसाठी उपयुक्त ठरू शकते. या सामाजिक गरजेचा विचार करून योजना पाटील यांनी शीत शवपेटी उपलब्ध करून दिल्याने परिसरातील नागरिकांना त्याचा लाभ होणार आहे. या लोकार्पणप्रसंगी माजी चेअरमन आनंदराव पाटील, संचालक डी. डी. पाटील, माजी नगरसेवक डॉ. भरत पाटील, मुख्याध्यापक सोमनाथ पाटील, प्रशांत पाटील, अशोकगीर गोसावी, सुनील पाटील, अजबराव पाटील, हेमराज पाटील, ज्ञानेश्वर पाटील, भैय्या पाटील तसेच संस्थेचे सचिव प्रमोद पाटील यांच्यासह मान्यवर उपस्थित होते. यावेळी उपस्थित मान्यवरांनी योजना पाटील यांच्या सामाजिक उपक्रमाचे कौतुक केले. नागरिकांच्या गरजा लक्षात घेऊन अशा प्रकारच्या सामाजिक उपक्रमांतून समाजोपयोगी सुविधा उपलब्ध करून देणे ही कौतुकास्पद बाब असल्याचे उपस्थितांनी नमूद केले. ओझर-अंतुर्ली विकास सोसायटीत भडगावमंडळाच्या अध्यक्षा तथा माजी सभापती, नगरसेविका योजना पाटील यांच्या पुढाकारातून सामाजिक बांधिलकी आणि माणुसकीची जाणीव जपत शीत शवपेटीचे लोकार्पण करण्यात आले. 'विशेषतः दूरवरून नातेवाईक येणे किंवा अंत्यसंस्काराला विलंब होणे अशा परिस्थितीत ही सुविधा नागरिकांसाठी उपयुक्त ठरू शकते. या सामाजिक गरजेचा विचार करून योजना पाटील यांनी शीत शवपेटी उपलब्ध करून दिल्याने परिसरातील नागरिकांना त्याचा लाभ होणार आहे.

पारोळ्यात राष्ट्रीय चर्मकार महासंघाचा ३१ वा वर्धापन दिन उत्साहात!



जन सम्राट टाईम्स

पारोळा| प्रतिनिधी: चर्मकार महासंघाचा ३१ वा स्थापना दिवस पारोळा येथे सामाजिक उपक्रमाने उत्साहात साजरा करण्यात आला. यानिमित्ताने श्री. संत शिरोमणी रविदास महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करून परिश्रम मूकबधिर विद्यालयातील विद्यार्थ्यांना फळांचे वाटप करण्यात आले. दि. २४ सप्टेंबर २०२६ रोजी आयोजित या कार्यक्रमात राष्ट्रीय चर्मकार महासंघाच्या पदाधिकाऱ्यांनी संत शिरोमणी रविदास महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

त्यानंतर परिश्रम मूकबधिर विद्यालय, पारोळा येथील विद्यार्थ्यांना फळांचे वाटप करण्यात आले. वर्धापन दिनाचा आनंद सामाजिक उपक्रमातून साजरा करून महासंघाने सामाजिक बांधिलकीचा संदेश दिला. या कार्यक्रास राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे युवक जिल्हाध्यक्ष तथा माजी उपनगराध्यक्ष दिपक अनुष्ठान, तालुकाध्यक्ष दयाराम मोरे, कर्मचारी आघाडीचे तालुकाध्यक्ष सुकलाल साळुंखे, रतिलाल मोरे, शहराध्यक्ष रवींद्र अहिरे, किरण पवार, समाधान ठाकरे, ईश्वर अहिरे, संतोष वाघ, प्रकाश महाले, करण साळुंखे, पंकज खजुरे, उज्वल मंगळे, विजय बागुल, रवींद्र विसावे यांच्यासह बहुसंख्य समाजबांधव उपस्थित होते. वर्धापन दिनानिमित्त आयोजित या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंदाचे वातावरण पाहायला मिळाले. सामाजिक उपक्रमांच्या माध्यमातून समाजातील गरजू घटकांपर्यंत पोहोचण्याचा महासंघाचा प्रयत्न यावेळी अधोरेखित झाला. चर्मकार महासंघाचा ३१ वा स्थापना दिवस पारोळा येथे सामाजिक उपक्रमाने उत्साहात साजरा करण्यात आला. यानिमित्ताने श्री. संत शिरोमणी रविदास महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करून परिश्रम मूकबधिर विद्यालयातील विद्यार्थ्यांना फळांचे वाटप करण्यात आले. दि. २४ सप्टेंबर २०२६ रोजी आयोजित या कार्यक्रमात राष्ट्रीय चर्मकार महासंघाच्या पदाधिकाऱ्यांनी संत शिरोमणी रविदास महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. या कार्यक्रमास राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे युवक जिल्हाध्यक्ष तथा माजी उपनगराध्यक्ष दिपक अनुष्ठान, तालुकाध्यक्ष दयाराम मोरे, कर्मचारी आघाडीचे तालुकाध्यक्ष सुकलाल साळुंखे, रतिलाल मोरे, शहराध्यक्ष

आरोग्य शिक्षणासाठी माहिती, शिक्षण व संवाद यंत्रणा अधिक सक्षम करा!

मेघना साकोरे-बोर्डीकर यांच्या सूचना; जनजागृतीसाठी लोकसहभाग आणि नाविन्यपूर्ण उपक्रमांवर भर

जन सम्राट टाईम्स



मुंबई । प्रतिनिधी : आरोग्यविषयक योजना व कार्यक्रमांची माहिती नागरिकांपर्यंत प्रभावीपणे पोहोचविण्यासोबतच त्यांच्या वर्तणुकीत सकारात्मक बदल घडवून आणण्यासाठी माहिती, शिक्षण व संवाद (आयईसी) विभागाची भूमिका महत्त्वपूर्ण आहे. जनजागृती, लोकसहभाग आणि प्रभावी संवादाच्या माध्यमातून आरोग्य शिक्षणाला व्यापक स्वरूप देण्यासाठी नाविन्यपूर्ण उपक्रम राबवावेत, अशा सूचना सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांनी दिल्या. सार्वजनिक आरोग्य विभागाच्या माहिती, शिक्षण व संवाद विभागाच्या कामकाजाचा तसेच प्रगतीचा आढावा आरोग्य भवन, मुंबई येथे राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आला. यावेळी त्या बोलत होत्या. राज्यमंत्री साकोरे-बोर्डीकर म्हणाल्या की, आरोग्यविषयक जनजागृती करताना केवळ माहितीचे प्रसारण न करता नागरिकांच्या वर्तणुकीत सकारात्मक बदल घडवून आणणे हा संवादाचा केंद्रबिंदू असला पाहिजे. आरोग्य मोहिमा, विविध आरोग्य दिन, सण-उत्सव तसेच स्थानिक गरजा लक्षात घेऊन आयईसी उपक्रमांचे नियोजन करावे. लोकसहभाग वाढविण्यासाठी सामाजिक व स्वयंसेवी संस्था, शैक्षणिक संस्था आणि प्रसारमाध्यमांचा समन्वयाने सहभाग घ्यावा, असे त्यांनी सांगितले. माध्यमनिहाय प्रभावी अंमलबजावणीवर भर वार्षिक कार्यक्रमानुसार आयईसी उपक्रमांचे नियोजन करून कार्यक्रमनिहाय मंजूर उपक्रमांची माध्यमनिहाय प्रभावी अंमलबजावणी करावी. माहिती व जनसंपर्क विभागाच्या शासन निर्णयानुसार तसेच राज्यस्तरीय आयईसी अनुदानाच्या माध्यमातून प्रस्ताव तयार करून आवश्यक मान्यता घेऊन उपक्रम राबवावेत. जिल्हास्तरावरील आयईसी उपक्रम जिल्हा विस्तार व माध्यम अधिकाऱ्यांच्या माध्यमातून प्रभावीपणे राबवून त्याचा नियमित आढावा घ्यावा, अशा सूचनाही त्यांनी दिल्या. आरोग्य मोहिमांसाठी आवश्यक माहिती व जनजागृती साहित्य संबंधित कार्यक्रमांच्या उद्दिष्टांनुसार तयार करून त्याचे योग्य पद्धतीने वितरण करावे. जिल्हास्तरीय आयईसी उपक्रमांना आवश्यक मार्गदर्शन उपलब्ध करून देतानाच विविध आरोग्य कार्यक्रमांसाठी प्रभावी व लोकाभिमुख जनजागृती साहित्य निर्मितीवर भर द्यावा. महाराष्ट्र आरोग्य पत्रिकेचे नियमित प्रकाशन तसेच आयईसी क्षेत्रातील नाविन्यपूर्ण उपक्रमांना प्रोत्साहन देण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या. 'आरोग्य दूत' उपक्रमाला चालना वर्तणूक बदल संवाद (बीसीसी) अधिक प्रभावी करण्यासाठी नाविन्यपूर्ण उपक्रम विकसित करावेत. यामध्ये स्वयंसेवी व सामाजिक संस्थांचा सक्रिय सहभाग घेण्यावर भर द्यावा. राज्यातील स्वयंसेवी संस्था, आंतरराष्ट्रीय स्वयंसेवी संस्था, युनिसेफ, जागतिक आरोग्य संघटना, राष्ट्रीय सेवा योजना, प्रेस इन्फॉर्मेशन ब्युरो, रेल्वे आऊटरीच ब्युरो तसेच राष्ट्रीय छात्रसेना यांसारख्या संस्थांशी समन्वय साधून आयईसी आणि बीसीसी उपक्रमांना व्यापक स्वरूप द्यावे.

Printed, published and Owned by Mukundrao Shamrao Nannaware, and printed at Shri Samarth Krupa Digital Printers, Plot No. 16. S.R. No.39/1 Sadguru Nagar, MIDC Jalgaon-425001 and published at 2nd FLOOR, BALAJI SANKUL, NEAR KHAJAMIYA CHOUK, JALGAON (MS.) PIN - 425001, Editor - Mukundrao Shamrao Nannaware Title Code - T/MH/2026/0422/5204/1306

जवाहर नगरातील नागरिकांचा नगरपरिषदेवर संताप!

गटारींच्या समस्याही ऐरणीवर महाराष्ट्र बँक ते कॉटेज हॉस्पिटल रस्ता नव्याने करण्याची मागणी

जन सम्राट टाईम्स

मलकापूर। प्रतिनिधी: शहरातील जवाहर नगर परिसरातील मूलभूत सुविधांचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. महाराष्ट्र बँक ते कॉटेज हॉस्पिटल परिसरातील रस्ता गेल्या सुमारे २० वर्षांपासून दुरुस्तीच्या प्रतीक्षेत असल्याने त्याची मोठ्या प्रमाणात दुरवस्था झाल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. रस्ता, पिण्याचे पाणी आणि गटारींच्या समस्यांकडे नगरपरिषद प्रशासनाने तातडीने लक्ष द्यावे, या मागणीसाठी जवाहर नगरातील नागरिकांनी मुख्याधिकारी यांचे दालन गाठून निवेदन सादर केले. नागरिकांच्या म्हणण्यानुसार, महाराष्ट्र बँक ते कॉटेज हॉस्पिटल हा परिसरातील महत्त्वाचा रहदारीचा मार्ग आहे. या मार्गावर अनेक दवाखाने व वैद्यकीय सुविधा असल्याने रस्त्यावर नागरिकांची तसेच वाहनांची मोठी वर्दळ असते. मात्र रस्त्यावर ठिकठिकाणी खड्डे पडल्याने नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. पावसाळ्यात या खड्ड्यांमध्ये पाणी साचत असल्याने परिस्थिती आणखी बिकट होत असल्याचे नागरिकांनी निवेदनात नमूद केले आहे. त्यामुळे महाराष्ट्र बँक ते कॉटेज हॉस्पिटल हा रस्ता तातडीने नव्याने सिमेंट काँक्रीटचा करावा. तसेच रस्त्याच्या दोन्ही बाजूंनी पावसाचे पाणी वाहून जाण्यासाठी योग्य गटारींची व्यवस्था करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. जुन्या पाणी पाइपलाइनमुळे दूषित पाण्याचा आरोप जवाहर नगर परिसरातील पिण्याच्या पाण्याच्या पुरवठ्याची सुमारे तीन इंची जुनी सिमेंट पाइपलाइन खराब झाल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. या पाइपलाइनमधून दुर्गंधीयुक्त व अस्वच्छ पाणी येत असल्याचा आरोप निवेदनातून करण्यात आला



आहे. पिण्याच्या पाण्याचा थेट संबंध नागरिकांच्या आरोग्याशी असल्याने या समस्येची तातडीने दखल घेण्याची मागणी करण्यात आली आहे. नवीन रस्त्याचे काम करताना रस्त्याच्या दोन्ही बाजूंनी नवीन पाणीपुरवठा पाइपलाइन टाकण्यात यावी, जेणेकरून भविष्यात वारंवार रस्ता खोदण्याची वेळ येणार नाही, अशी मागणीही नागरिकांनी केली आहे. तुंबलेल्या गटारींमुळे घरात पाणी शिरण्याची समस्या महाराष्ट्र बँक ते नारखेडे कॉम्प्लेक्स परिसरातील सर्व्हिस लाईनमधील गटारी तुंबल्याने पाण्याचा निचरा होत नसल्याचे नागरिकांनी सांगितले. पावसाचे पाणी नाल्यांमध्ये साचून काही ठिकाणी घरांमध्ये शिरत असल्याचा आरोपही करण्यात आला आहे. त्यामुळे परिसरात दुर्गंधी निर्माण होत असून रोगराईचा धोका वाढण्याची भीती नागरिकांनी व्यक्त केली आहे. या गटारी पूर्णपणे नव्याने बांधून त्या रुंद व खोल करण्यात याव्यात, तसेच पावसाळी पाण्याचा योग्य निचरा होईल, अशी कायमस्वरूपी व्यवस्था करण्यात यावी, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे. मूलभूत सुविधांसाठी आणखी किती प्रतीक्षा? रस्ता, शुद्ध पिण्याचे पाणी आणि योग्य जलनिस्सारण व्यवस्था या नागरिकांच्या मूलभूत गरजा आहेत. मात्र जवाहर नगरातील या समस्या दीर्घकाळ प्रलंबित असल्याने नागरिकांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे. नागरिकांच्या निवेदनाची नगरपरिषद प्रशासन कितपत गांभीर्याने दखल घेते आणि प्रत्यक्ष कामाला कधी सुरुवात होते, याकडे आता परिसरातील नागरिकांचे लक्ष लागले आहे

.शहरातील जवाहर नगर परिसरातील मूलभूत सुविधांचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. महाराष्ट्र बँक ते कॉटेज हॉस्पिटल परिसरातील रस्ता गेल्या सुमारे २० वर्षांपासून दुरुस्तीच्या प्रतीक्षेत असल्याने त्याची मोठ्या प्रमाणात दुरवस्था झाल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. रस्ता, पिण्याचे पाणी आणि गटारींच्या समस्यांकडे नगरपरिषद प्रशासनाने तातडीने लक्ष द्यावे, या मागणीसाठी जवाहर नगरातील नागरिकांनी मुख्याधिकारी यांचे दालन गाठून निवेदन सादर केले. नागरिकांच्या म्हणण्यानुसार, महाराष्ट्र बँक ते कॉटेज हॉस्पिटल हा परिसरातील महत्त्वाचा रहदारीचा मार्ग आहे. या मार्गावर अनेक दवाखाने व वैद्यकीय सुविधा असल्याने रस्त्यावर नागरिकांची तसेच वाहनांची मोठी वर्दळ असते. मात्र रस्त्यावर ठिकठिकाणी खड्डे पडल्याने नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. पावसाळ्यात या खड्ड्यांमध्ये पाणी साचत असल्याने परिस्थिती आणखी बिकट होत असल्याचे नागरिकांनी निवेदनात नमूद केले आहे. या पाइपलाइनमधून दुर्गंधीयुक्त व अस्वच्छ पाणी येत असल्याचा आरोप निवेदनातून करण्यात आला आहे. पिण्याच्या पाण्याचा थेट संबंध नागरिकांच्या आरोग्याशी असल्याने या समस्येची तातडीने दखल घेण्याची मागणी करण्यात आली आहे. नवीन रस्त्याचे काम करताना रस्त्याच्या दोन्ही बाजूंनी नवीन पाणीपुरवठा पाइपलाइन टाकण्यात यावी, जेणेकरून भविष्यात वारंवार रस्ता खोदण्याची वेळ येणार नाही, अशी मागणीही नागरिकांनी केली आहे. तुंबलेल्या गटारींमुळे घरात पाणी शिरण्याची समस्या महाराष्ट्र बँक ते नारखेडे कॉम्प्लेक्स परिसरातील सर्व्हिस लाईनमधील गटारी तुंबल्याने पाण्याचा निचरा होत नसल्याचे नागरिकांनी सांगितले. पावसाचे पाणी नाल्यांमध्ये साचून काही ठिकाणी घरांमध्ये शिरत असल्याचा आरोपही करण्यात आला आहे.

जन सम्राट टाईम्स ब्रेक न्यूज

अंतुर्लीत रक्तदान शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद!



जन सम्राट टाईम्स

अंतुर्ली| प्रतिनिधी जिल्हा आरोग्य अधिकारी तसेच तालुका आरोग्य अधिकारी यांच्या मार्गदर्शक सूचनांनुसार अंतुर्ली येथील प्राथमिक आरोग्य केंद्राच्या वतीने रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. सामाजिक बांधिलकी जपत आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमाला ग्रामस्थ, सामाजिक कार्यकर्ते, स्थानिक नागरिक तसेच आरोग्य केंद्रात उपचारासाठी आलेले रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. या रक्तदान शिबिराचे आयोजन प्राथमिक आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी डॉ. शैलेश पाटील यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आले. यावेळी डॉ. पाटील यांनी रक्तदानाचे महत्त्व विशद करताना, "रक्तदान हे श्रेष्ठदान असून, आपल्या एका रक्तदानामुळे गरजू रुग्णाचे प्राण वाचण्यास मदत होऊ शकते," असे आवाहन केले. शिबिराच्या यशस्वीयोजनासाठी प्राथमिक आरोग्य केंद्रातील आरोग्य सहाय्यक, आरोग्य सेवक, आरोग्य सेविका, गटप्रवर्तक तसेच आशा स्वयंसेविकांनी विशेष परिश्रम घेतले. रक्तदात्यांचे मार्गदर्शन, नोंदणी तसेच शिबिरातील विविध व्यवस्थापनाची जबाबदारी आरोग्य पथकाने नियोजनबद्ध पद्धतीने पार पाडली. विशेष म्हणजे, अंतुर्ली गावातील ग्रामस्थ मंडळ, सामाजिक कार्यकर्ते आणि नागरिकांनी कोणत्याही अतिरिक्त आवाहनाची प्रतीक्षा न करता स्वयंप्रेरणेने रक्तदानासाठी पुढाकार घेतला. तसेच प्राथमिक आरोग्य केंद्रात उपचारासाठी आलेले काही रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांनीही सामाजिक कर्तव्याची जाणीव ठेवत रक्तदानात सहभाग नोंदविला. त्यामुळे संपूर्ण शिबिरस्थळी उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. रक्तदान करणाऱ्या सर्व रक्तदात्यांचे प्राथमिक आरोग्य केंद्राच्या आरोग्य पथकाच्या वतीने आभार मानण्यात आले. रक्तदात्यांना प्रमाणपत्र देऊन त्यांचा गौरवही करण्यात आला. या उपक्रमामुळे रक्तदानाचे महत्त्व नागरिकांपर्यंत पोहोचण्यास मदत झाली असून, गरजू रुग्णांसाठी रक्त उपलब्ध करून देण्याबरोबरच 'रक्तदानातून सामाजिक बांधिलकी' हा संदेशही देण्यात आला. अंतुर्ली प्राथमिक आरोग्य केंद्राच्या या उपक्रमाचे ग्रामस्थांकडून कौतुक करण्यात आले. जिल्हा आरोग्य अधिकारी तसेच तालुका आरोग्य अधिकारी यांच्या मार्गदर्शक सूचनांनुसार अंतुर्ली येथील प्राथमिक आरोग्य केंद्राच्या वतीने रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. सामाजिक बांधिलकी जपत आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमाला ग्रामस्थ, सामाजिक कार्यकर्ते, स्थानिक नागरिक तसेच आरोग्य केंद्रात उपचारासाठी आलेले रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. या रक्तदान शिबिराचे आयोजन प्राथमिक आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी डॉ. शैलेश पाटील यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आले.

न्यू इंग्लिश स्कूलमध्ये गणेशोत्सव विविध स्पर्धा उत्साहात

विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग; ११०० मोदकांचा गणरायाला नैवेद्य

जन सम्राट टाईम्स

नशिराबाद । प्रतिनिधी: येथील न्यू इंग्लिश स्कूल प्राथमिक विद्यामंदिरात गणेशोत्सव भक्तिमय आणि उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. विद्यार्थ्यांच्या उत्स्फूर्त सहभागातून विविध शैक्षणिक, सांस्कृतिक, मनोरंजनात्मक आणि कौशल्यविकासात्मक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. गणेशोत्सवाची सुरुवात विद्यार्थी बालमंडळाच्या स्थापनेने झाली. यामध्ये अध्यक्षपदी चित्राक्षी चौधरी, उपाध्यक्षपदी ज्ञानिका पाटील, खजिनदारपदी ज्ञानदा चौधरी, सचिवपदी गितेश चव्हाण, तर सहसचिवपदी स्वराज भावसार यांची निवड करण्यात आली. त्यानंतर बालमंडळाचे सहसचिव स्वराज भावसार यांच्या हस्ते श्री गणेशाची विधिवत स्थापना करण्यात आली. उत्सवाच्या कालावधीत विद्यार्थ्यांसाठी विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले.



इंग्रजी स्पेलिंग स्पर्धेसाठी एकूण १२ गट करण्यात आले होते. यामध्ये गट क्रमांक ४ मधील मृणाल चौधरी व डिंपल रोटे तसेच गट क्रमांक ८ मधील चित्राक्षी चौधरी व चैताली पाटील यांनी प्रथम क्रमांक पटकावला. गट क्रमांक ८ मधील देवेंद्र भोई व रुद्र चौधरी यांनी द्वितीय क्रमांक मिळविला. गीत गायन स्पर्धेत करण महाजन याने प्रथम, देवेंद्र भोई याने द्वितीय, तर गितेश चव्हाण याने तृतीय क्रमांक मिळविला. मोदक बनविण्याच्या स्पर्धेत इयत्ता तिसरीतील यश पाटील, जिग्नेश मराठे व निशा चौधरी तसेच इयत्ता चौथीतील चित्राक्षी चौधरी, पूर्वजा नारखेडे व स्वराज भावसार यांनी उल्लेखनीय कामगिरी करत विजेतेपद मिळविले. गणेशोत्सवाच्या काळात शाळेच्या परिपाठामध्ये दररोज श्री गणेशाच्या गोष्टी, भक्तिगीते तसेच विविध संस्कारक्षम उपक्रम घेण्यात आले. या उपक्रमांमधून विद्यार्थ्यांना आनंदासोबतच भारतीय संस्कृती, परंपरा आणि संस्कारांची ओळख करून देण्यात आली. भक्तिमय वातावरणात गणरायाला निरोप गणेशोत्सवाच्या सांगता प्रसंगी श्री गणेशमूर्तीचा विसर्जन सोहळा भक्तिमय आणि उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.

भाऊसाहेब हिरे शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात लघुवेतन कर्मचारी संघटनेच्या फलकाचे अनावरण

वैद्यकीय अधीक्षक डॉ. मुकरम खान यांच्यासह पदाधिकाऱ्यांची उपस्थिती

जन सम्राट टाईम्स

धुळे । (प्रतिनिधी): श्री भाऊसाहेब हिरे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय येथे महाराष्ट्र राज्य लघुवेतन सरकारी कर्मचारी संघ, मंत्रालय मुंबईच्या फलकाचे अनावरण गुरुवारी (दि. २४ सप्टेंबर) उत्साहपूर्ण वातावरणात करण्यात आले. महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. अजित पाठक, वैद्यकीय अधीक्षक डॉ. मुकरम खान, संघटनेचे प्रदेशाध्यक्ष गिरीश चौधरी तसेच डॉ. अरुणकुमार नागे यांच्या हस्ते फलकाचे अनावरण करण्यात आले. यावेळी संघटनेचे राज्य कार्याध्यक्ष चंद्रकांत भदाणे, राज्य सचिव विनोद सोनार, राज्य महिला अध्यक्ष सरलाबाई शिरसाट, राज्य सचिव कांताबाई वर्पे, राज्य ज्येष्ठ सल्लागार वामनराव पाटील, धुळे जिल्हाध्यक्ष राहुल वाघ यांच्यासह संघटनेचे विविध पदाधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमास नंदकिशोर अंबेरे, गोकुळ पाटील, संजू खैरनार, अनिल मराठी, विजय सूर्यवंशी,



अक्षय महाले, धीरज चव्हाण, संजय माळी, राधेश्याम देसाई, संघटक भगवान खैरनार, विठ्ठल तिथे, ताराचंद पाटील, सोमनाथ सोनार, कांतीलाल कल्याणी आदींची उपस्थिती होती. तसेच सुनिता गायकवाड, मीनाबाई गायकवाड, शोभा अंभोरे, संजीवनी उईके, रेखा पवार, अनिता लोहरे, प्राची देशमुख, अविनाश एडके, करवादास सूर्यवंशी, देविदास पाटील, सिद्धार्थ जोंधळे, दुर्गेश लोखंडे, महेंद्र गोयर, बैसाणे, देविदास चावरे यांच्यासह वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयातील कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. संघटनेचा फलक रुग्णालय परिसरात अनावरण करण्यात आल्याने कर्मचारी संघटनेच्या कार्याला अधिक संघटित स्वरूप मिळण्यास मदत होईल, अशी भावना यावेळी उपस्थितांनी व्यक्त केली. कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय येथे महाराष्ट्र राज्य लघुवेतन सरकारी कर्मचारी संघ, मंत्रालय मुंबईच्या फलकाचे अनावरण गुरुवारी (दि. २४ सप्टेंबर) उत्साहपूर्ण वातावरणात करण्यात आले. महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. अजित पाठक, वैद्यकीय अधीक्षक डॉ. मुकरम खान, संघटनेचे प्रदेशाध्यक्ष गिरीश चौधरी तसेच डॉ. अरुणकुमार नागे यांच्या हस्ते फलकाचे अनावरण करण्यात आले.

शेतकरी आत्महत्याग्रस्त कुटुंबाला रामदास पाटील यांचा मदतीचा हात

जन सम्राट टाईम्स

बोदवड । प्रतिनिधी: येवती येथील शेतकरी काशिनाथ मारोती बावस्कर यांच्या निधनामुळे त्यांच्या कुटुंबावर मोठे संकट ओढवले आहे. कुटुंबातील कर्त्या व्यक्तीच्या निधनाने कुटुंबाचा आधार हरपला असून, शासनाकडून मिळणाऱ्या मदतीची प्रतीक्षा आहे. या परिस्थितीची दखल घेत माजी जिल्हा परिषद सदस्यांच्या पती रामदास पाटील यांनी सामाजिक बांधिलकी जपत बावस्कर कुटुंबाला मदतीचा हात दिला आहे. शासनाकडून आर्थिक मदत मिळेपर्यंत कुटुंबाला आवश्यक किराणा साहित्य व कपडे उपलब्ध करून देण्यासोबतच मुलांच्या शैक्षणिक खर्चाची जबाबदारीही त्यांनी स्वीकारली आहे. आर्थिक अडचणीच्या काळात मिळालेल्या या मदतीमुळे कुटुंबाला दैनंदिन गरजा भागविण्यास तसेच मुलांचे शिक्षण सुरू ठेवण्यास आधार मिळणार आहे. संकटाच्या काळात पुढे येत बावस्कर कुटुंबाला मदत केल्याबद्दल रामदास पाटील यांच्या



सामाजिक उपक्रमाचे परिसरातून कौतुक होत आहे. दरम्यान, शेतकरी कुटुंबाची आर्थिक परिस्थिती लक्षात घेऊन शासनाने संबंधित प्रकरणाची नियमानुसार चौकशी करून पात्रतेनुसार मदत तातडीने उपलब्ध करून द्यावी, अशी अपेक्षाही व्यक्त होत आहे. येवती येथील शेतकरी काशिनाथ मारोती बावस्कर यांच्या निधनामुळे त्यांच्या कुटुंबावर मोठे संकट ओढवले आहे. कुटुंबातील कर्त्या व्यक्तीच्या निधनाने कुटुंबाचा आधार हरपला असून, शासनाकडून मिळणाऱ्या मदतीची प्रतीक्षा आहे. या परिस्थितीची दखल घेत माजी जिल्हा परिषद सदस्यांच्या पती रामदास पाटील यांनी सामाजिक बांधिलकी जपत बावस्कर कुटुंबाला मदतीचा हात दिला आहे. शासनाकडून आर्थिक मदत मिळेपर्यंत कुटुंबाला आवश्यक किराणा साहित्य व कपडे उपलब्ध करून देण्यासोबतच मुलांच्या शैक्षणिक खर्चाची जबाबदारीही त्यांनी स्वीकारली आहे. आर्थिक अडचणीच्या काळात मिळालेल्या या मदतीमुळे कुटुंबाला दैनंदिन गरजा भागविण्यास तसेच मुलांचे शिक्षण सुरू ठेवण्यास आधार मिळणार आहे. संकटाच्या काळात पुढे येत बावस्कर कुटुंबाला मदत केल्याबद्दल रामदास पाटील यांच्या सामाजिक उपक्रमाचे परिसरातून कौतुक होत आहे.

धरणगावात शाक्त राज्याभिषेक दिन व सत्यशोधक समाज स्थापना दिन उत्साहात

'शिवराय, फुले, शाहू, आंबेडकर हेच आपले प्रेरणास्थान' — गुलाबराव वाघ

जन सम्राट टाईम्स

धरणगाव । प्रतिनिधी: शहरातील छत्रपती शिवाजी महाराज स्मारकाजवळ दुसरा शिवराज्याभिषेक दिन (शाक्त राज्याभिषेक दिन) तसेच सत्यशोधक समाज स्थापना दिन उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. यावेळी छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा ज्योतिराव फुले, राजर्षी शाहू महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या समतावादी, पुरोगामी व सामाजिक न्यायाच्या विचारांचे स्मरण करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सत्यशोधक समाज संघाचे जिल्हाध्यक्ष पी. डी. पाटील यांनी केले. त्यांनी शाक्त राज्याभिषेक दिन तसेच सत्यशोधक समाजाच्या स्थापनेचा इतिहास आणि त्यामागील सामाजिक विचार उपस्थितांसमोर मांडला. कार्यक्रमाच्या प्रारंभी छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा फुले, राजर्षी शाहू महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांना मान्यवरांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आले.

त्यानंतर छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्मारकासही माल्यार्पण करण्यात आले. यावेळी बोलताना शिवसेना (उबाठा) उपनेते गुलाबराव वाघ यांनी, "शिवराय, फुले, शाहू आणि आंबेडकर हेच आपले प्रेरणास्थान आहेत," असे प्रतिपादन केले. सामाजिक समता, शिक्षण, न्याय आणि मानवमुक्तीचा विचार पुढे नेण्यासाठी महापुरुषांच्या विचारांचे केवळ



स्मरण न करता ते आचरणात आणण्याची गरज असल्याचे त्यांनी सांगितले. कार्यक्रमाला लोकनियुक्त नगराध्यक्षा लीलाताई चौधरी, माळी समाजाध्यक्ष व्ही. टी. माळी, पाटील समाजाध्यक्ष माधवराव पाटील, काँग्रेसचे ओबीसी राज्य सचिव रामचंद्र महाजन, शिवसेनेचे गटनेते विलास महाजन, प्रा. भदाणे, सचिव आर. डी. महाजन, नगरसेविका हेमांगी किरण अग्निहोत्री, काँग्रेस नेते सुनील सोनार, राजेंद्र महाजन, पत्रकार विकास पाटील यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते. तसेच माहिती अधिकार कायदा संघाचे जिल्हाध्यक्ष आबासाहेब राजेंद्र वाघ, सत्यशोधक समाजाचे प्रचारक एच. डी. माळी, राष्ट्रीय किसान मोर्चाचे तालुकाध्यक्ष गोरख देशमुख, संत सावता माळी युवक संघाचे विभागीय अध्यक्ष विनायक महाजन, तालुकाध्यक्ष दिनेश महाजन, अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेचे तालुकाध्यक्ष राजेंद्र महाजन, सामाजिक कार्यकर्ते भीमराव पाटील, सूरज वाघरे, सुधाकर मोरे, डी. ए. पाटील, गोपाल महाजन, सोमनाथ चिते, भैय्या धनगर, गुलाब महाजन यांच्यासह सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक, शैक्षणिक आणि पत्रकारिता क्षेत्रातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सत्यशोधक विचार मंच, धरणगाव संत सावता माळी युवक संघ, कार्यकर्त्यांनी सहकार्य केले. शहरातील छत्रपती शिवाजी महाराज स्मारकाजवळ दुसरा शिवराज्याभिषेक दिन (शाक्त राज्याभिषेक दिन) तसेच सत्यशोधक समाज स्थापना दिन उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. राजर्षी शाहू महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या समतावादी, पुरोगामी व सामाजिक न्यायाच्या विचारांचे स्मरण करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सत्यशोधक समाज संघाचे जिल्हाध्यक्ष पी. डी. पाटील यांनी केले. त्यांनी शाक्त राज्याभिषेक दिन तसेच सत्यशोधक समाजाच्या स्थापनेचा इतिहास आणि त्यामागील सामाजिक विचार उपस्थितांसमोर मांडला. कार्यक्रमाच्या प्रारंभी छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा फुले, राजर्षी शाहू महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांना मान्यवरांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आले.

सुरभी मित्र मंडळातर्फे 'छप्पन भोग'; अण्णानगरात गणेशोत्सवाचा उत्साह

जन सम्राट टाईम्स

नशिराबाद। प्रतिनिधी: नशिराबाद येथील अण्णानगर परिसरात सुरभी मित्र मंडळाच्या वतीने भक्तिमय वातावरणात आकर्षक 'छप्पन भोग' कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. बाप्पाच्या चरणी ५६ विविध प्रकारच्या नैवेद्यांची करण्यात आलेली सुंदर आणि नेटकी मांडणी भाविकांसाठी विशेष आकर्षण ठरली. गणपती बाप्पाच्या दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांना भक्तीबरोबरच प्रसादाचा आनंद मिळावा, या उद्देशाने मंडळाच्या कार्यकर्त्यांनी विविध प्रकारच्या मिठाई, फळे तसेच पारंपरिक खाद्यपदार्थांचा समावेश असलेला छप्पन भोग सजविला. विविध रंग, आकार आणि आकर्षक मांडणीमुळे हा नैवेद्य भाविकांचे लक्ष वेधून घेत होता. या धार्मिक उपक्रमासाठी सुरभी मित्र मंडळाचे पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाच्या निमित्ताने अण्णानगर परिसरातील नागरिक, महिला, युवक तसेच गणेशभक्तांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावत बाप्पाचे दर्शन घेतले. छप्पन भोगाचे विलोभनीय स्वरूप पाहण्यासाठीही भाविकांची गर्दी झाली होती. भाविकांनी भक्तिभावाने गणरायाचे दर्शन घेतल्यानंतर महाप्रसादाचा लाभ घेतला. मंडळाच्या या आगळ्यावेगळ्या धार्मिक उपक्रमामुळे अण्णानगर परिसरातील गणेशोत्सवाचा उत्साह आणखी वाढला. बाप्पा मोरया'च्या जयघोषासह भक्तिमय आणि मंगलमय वातावरण निर्माण झाले होते. गणेशोत्सवाच्या माध्यमातून धार्मिक परंपरा जपत सामाजिक एकोपा आणि भक्तीभाव वृद्धिंगत करण्याचा सुरभी मित्र मंडळाचा हा उपक्रम नागरिकांच्या विशेष पसंतीस उतरला.

कोळगाव येथे कर्मवीर तात्यासाहेब हरी रावजी पाटील यांच्या 25 व्या पुण्यस्मरण सप्ताहास उत्साहात प्रारंभ

प्रतिमा पूजन व उद्घाटन सोहळा उत्साहात; व्यसनमुक्ती, व्यक्तिमत्त्व विकास व 'स्वप्नातील भारत' पथनाट्यातून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन

जन सम्राट टाईम्स

भडगाव । प्रतिनिधी: कर्मवीर तात्यासाहेब हरी रावजी पाटील किसान शिक्षण संस्था, भडगाव संचलित गोपीचंद पुना पाटील विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय, न्यू इंग्लिश मीडियम स्कूल तसेच कला व विज्ञान महाविद्यालय, कोळगाव यांच्या संयुक्त विद्यमाने संस्थेचे दिवंगत संस्थापक अध्यक्ष कर्मवीर तात्यासाहेब हरी रावजी पाटील यांच्या २५ व्या पुण्यस्मरण सप्ताहास बुधवार, दि. २३ सप्टेंबर २०२६ रोजी उत्साहपूर्ण व प्रेरणादायी वातावरणात प्रारंभ झाला. पुण्यस्मरण सप्ताहाच्या उद्घाटनप्रसंगी संस्थेचे चेअरमन नानासाहेब प्रतापराव हरी पाटील यांच्या हस्ते कर्मवीर तात्यासाहेब हरी रावजी पाटील यांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी स्थानिक शाळा समितीचे अध्यक्ष युवराज पाटील, सदस्य संभाजी पाटील, विद्यालयाचे प्राचार्य प्रा. आर. आर. वळखंडे तसेच वरिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. सुरेश कोळी यांची प्रमुख उपस्थिती होती.

तात्यासाहेबांच्या विचारांचा आदर्श घेण्याचे आवाहन कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य प्रा. आर. आर. वळखंडे यांनी केले. त्यांनी आपल्या प्रास्ताविकातून कर्मवीर तात्यासाहेब हरी रावजी पाटील यांच्या शैक्षणिक, सामाजिक व संस्थात्मक कार्याचा आढावा घेतला. विद्यार्थ्यांनी त्यांच्या विचारांचा आणि कार्याचा आदर्श घेऊन शैक्षणिक प्रगतीसोबतच सामाजिक बांधिलकी जोपासावी, असे आवाहन त्यांनी केले. शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांकडून ५० खुर्च्यांची भेट कर्मवीर तात्यासाहेबांच्या २५ व्या पुण्यस्मरणानिमित्त गोपीचंद पुना पाटील विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या वतीने संस्थेस ५० खुर्च्या भेट देण्यात आल्या. या उपक्रमातून संस्थेविषयीची कृतज्ञता, आपुलकी आणि सामाजिक बांधिलकी व्यक्त करण्यात आली.



'व्यसनमुक्ती : आजच्या काळाची गरज' विषयावर मार्गदर्शन उद्घाटन सोहळ्यानंतर विद्यार्थ्यांसाठी विविध मार्गदर्शनपर कार्यक्रम घेण्यात आले. 'व्यसनमुक्ती : आजच्या काळाची गरज' या विषयावर धुळे येथील नितीन पाटील यांनी प्रभावी व्याख्यान दिले. व्यसनांचे विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक, मानसिक, सामाजिक आणि कौटुंबिक जीवनावर होणारे दुष्परिणाम स्पष्ट करत त्यांनी विद्यार्थ्यांना व्यसनांपासून दूर राहण्याचे आवाहन केले. तसेच 'व्यक्तित्त्व विकास' या विषयावर धुळे येथील प्रशांत पाटील यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. आत्मविश्वास, सकारात्मक दृष्टिकोन, संवादकौशल्य, वेळेचे नियोजन आणि व्यक्तिमत्त्व विकासासाठी आवश्यक विविध गुणांबाबत त्यांनी विद्यार्थ्यांना उपयुक्त मार्गदर्शन केले. 'स्वप्नातील भारत' पथनाट्यातून सामाजिक संदेश कार्यक्रमाचे विशेष आकर्षण ठरले ते चाळीसगाव येथील रोहित जाधव सर, विजय पाटील सर व त्यांच्या टीमने सादर केलेले 'स्वप्नातील भारत' हे पथनाट्य. प्रभावी अभिनय, संवाद आणि सामाजिक संदेशाच्या माध्यमातून सादर करण्यात आलेल्या या पथनाट्याने विद्यार्थी व उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले. देशाच्या प्रगतीतील युवकांची भूमिका, सामाजिक जबाबदारी, स्वच्छता, शिक्षण, व्यसनमुक्ती आणि राष्ट्रनिर्मितीचा संदेश पथनाट्यातून देण्यात आला. विद्यार्थ्यांसाठी विविध स्पर्धांचे आयोजन पुण्यस्मरण सप्ताहानिमित्त विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना वाव मिळावा, क्रीडा व सांस्कृतिक कौशल्यांना व्यासपीठ मिळावे आणि त्यांचा सर्वांगीण विकास व्हावा, या उद्देशाने विविध स्पर्धा व उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये गोळाफेक, थाळीफेक, टॅलेंट सर्च परीक्षा, पोस्टर प्रेझेंटेशन, वादविवाद व वक्तृत्व स्पर्धा, क्रिकेट स्पर्धा, डोळ्यावर पट्टी बांधून ग्लासवर पाय न ठेवता क्रॉस चालणे, वॉटर पासिंग यांसह विविध बौद्धिक, क्रीडा आणि सांस्कृतिक स्पर्धांचा समावेश आहे

जन सम्राट टाईम्स ब्रेक न्यूज

महिलांची भागीदारी सुनिश्चित करण्यासाठी भीम आर्मीचे आंदोलन



जन सम्राट टाईम्स

धुळे | प्रतिनिधी: अनुसूचित जाती (एससी), अनुसूचित जमाती (एसटी), इतर मागासवर्गीय (ओबीसी) तसेच इतर वर्गातील महिलांना आरक्षणानुसार उपलब्ध असलेल्या पदांवर तात्काळ भरती करून त्यांची भागीदारी सुनिश्चित करावी, या मागणीसाठी भीम आर्मीच्या वतीने धुळ्यात 'संपूर्ण भागीदारी आंदोलन' करण्यात आले. आंदोलनानंतर विविध मागण्यांचे निवेदन जिल्हाधिकाऱ्यांना सादर करण्यात आले.

भारतीय संविधानाने नागरिकांना समान संधीचा अधिकार दिला आहे. मात्र शिक्षण, रोजगार, राजकीय व प्रशासकीय क्षेत्रासह न्यायव्यवस्था आणि विविध निर्णयप्रक्रियेत महिलांना अपेक्षित प्रतिनिधित्व मिळत नसल्याचा दावा आंदोलनकर्त्यांनी केला. विशेषतः एससी, एसटी आणि ओबीसी प्रवर्गातील महिलांना आरक्षणाचा लाभ आणि प्रतिनिधित्व प्रभावीपणे मिळण्यासाठी ठोस उपाययोजना करण्याची आवश्यकता असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. आरक्षणाच्या तरतुदींची प्रभावी अंमलबजावणी करावी, विविध विभागांमधील रिक्त आरक्षित पदांची तातडीने भरती करावी आणि पात्र महिलांना त्यांच्या हक्काचे प्रतिनिधित्व मिळेल, यासाठी प्रशासनाने आवश्यक कार्यवाही करावी, अशी मागणी भीम आर्मीच्या वतीने करण्यात आली. महिलांना शिक्षण आणि रोजगाराच्या संधींसोबतच प्रशासकीय, राजकीय आणि निर्णयप्रक्रियेतील सहभाग वाढविण्यासाठी शासनाने ठोस पावले उचलावीत, अशी भूमिकाही आंदोलनकर्त्यांनी मांडली. यावेळी भीम आर्मीचे महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष पँथर राहुल वाघ, सागर चव्हाण यांच्यासह संघटनेचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. आंदोलनानंतर मागण्यांचे निवेदन जिल्हाधिकाऱ्यांकडे सादर करण्यात आले अनुसूचित जाती (एससी), अनुसूचित जमाती (एसटी), इतर मागासवर्गीय (ओबीसी) तसेच इतर वर्गातील महिलांना आरक्षणानुसार उपलब्ध असलेल्या पदांवर तात्काळ भरती करून त्यांची भागीदारी सुनिश्चित करावी, या मागणीसाठी भीम आर्मीच्या वतीने धुळ्यात 'संपूर्ण भागीदारी आंदोलन' करण्यात आले. आंदोलनानंतर विविध मागण्यांचे निवेदन जिल्हाधिकाऱ्यांना सादर करण्यात आले. भारतीय संविधानाने नागरिकांना समान संधीचा अधिकार दिला आहे. मात्र शिक्षण, रोजगार, राजकीय व प्रशासकीय क्षेत्रासह न्यायव्यवस्था आणि विविध निर्णयप्रक्रियेत महिलांना अपेक्षित प्रतिनिधित्व मिळत नसल्याचा दावा आंदोलनकर्त्यांनी केला.

'शाळा वाचवा, शिक्षण वाचवा' मंचाचे जिल्हाधिकारी कार्यालयासमोर निदर्शने

शाळा बंद करण्याचा निर्णय मागे घ्या

जन सम्राट टाईम्स

धुळे । प्रतिनिधी: गुणवत्तापूर्ण शिक्षण हा प्रत्येक मुलाचा अधिकार असून, सार्वजनिक शिक्षण व्यवस्था मजबूत करण्याच्या विविध मागण्यांसाठी 'शाळा वाचवा, शिक्षण वाचवा' मंचाच्या वतीने धुळे जिल्हाधिकारी कार्यालयासमोर निदर्शने करण्यात आली. यावेळी विविध मागण्यांचे निवेदन जिल्हा प्रशासनाला सादर करण्यात आले. आंदोलनकर्त्यांच्या म्हणण्यानुसार, नवीन शैक्षणिक धोरण तसेच विविध शासन निर्णयांमुळे सरकारी व अनुदानित शाळांवर परिणाम होत असून, ग्रामीण, आदिवासी, दलित, भटके-विमुक्त, बहुजन, कष्टकरी, शेतकरी आणि अल्पसंख्याक समाजातील विद्यार्थ्यांच्या शिक्षणाच्या संधींवर परिणाम होण्याची शक्यता आहे. त्यामुळे सार्वजनिक शिक्षण व्यवस्था मजबूत करण्याची गरज असल्याचे मंचाने निवेदनात म्हटले आहे. महाराष्ट्र शासनाने १५ मार्च २०२४ रोजी संचमान्यतेचे सुधारित निकष निश्चित करणारा शासन निर्णय जारी केला होता. त्यानंतर या निर्णयात विविध सुधारणा व निर्देशही जारी झाले आहेत. मंचाने मात्र या संचमान्यता धोरणावर आक्षेप घेत ते मागे घेण्याची मागणी केली आहे. 'गाव, तांडा, वाडी-वस्ती तेथे शाळा' धोरण कायम ठेवा २० पेक्षा कमी विद्यार्थीसंख्या असल्याचे कारण देऊन शाळा बंद करण्याचा निर्णय मागे घ्यावा, अशी प्रमुख मागणी आंदोलनकर्त्यांनी केली. गाव, तांडा, वाडी आणि वस्ती तेथे शाळा हे धोरण कायम ठेवावे, विद्यार्थी संख्या कमी असली तरी शाळा सुरू ठेवावी आणि प्रत्येक वर्गासाठी स्वतंत्र शिक्षक उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली. तसेच १५ मार्च २०२४ रोजीच्या संचमान्यता निर्णयामुळे गुणवत्तापूर्ण शिक्षणावर परिणाम होत असल्याचा दावा करत हा निर्णय मागे घेऊन प्रत्येक विषयासाठी स्वतंत्र शिक्षक उपलब्ध करून देण्याची मागणी मंचाने केली. नवीन शैक्षणिक धोरण रद्द करण्याची मागणी नवीन शैक्षणिक धोरणामुळे उच्च शिक्षणाचे खासगीकरण आणि बाजारीकरण वाढण्याची शक्यता असल्याचा दावा मंचाने केला. विद्यार्थीसंख्येच्या अटींमुळे ग्रामीण भागातील आणि छोट्या शहरांतील महाविद्यालयांवर परिणाम होऊ शकतो, अशी भूमिका निवेदनात मांडण्यात आली. त्यामुळे नवीन शैक्षणिक धोरण रद्द करावे, अशी मागणी करण्यात आली. शिक्षणातील विषमता दूर करण्यासाठी केजी ते पीजी सर्व विद्यार्थ्यांना मोफत, गुणवत्तापूर्ण आणि समान शिक्षण उपलब्ध करून द्यावे.



ॲट्रॉसिटी अटकपूर्व जामिनाच्या आव्हान देणारी याचिका न्यायालयाने फेटाळली

जन सम्राट टाईम्स

भुसावळ (प्रतिनिधी): अनुसूचित जमाती (अत्याचार प्रतिबंधक) कायद्यातील २०१८ च्या दुरुस्तीच्या घटनात्मक वैधतेला आव्हान देणारी जनहित याचिका सर्वोच्च न्यायालयाने मंगळवारी, दि. २२ सप्टेंबर रोजी फेटाळून लावली. त्यामुळे या कायद्यातील कलम १८-अ अंतर्गत अटकपूर्व जामिनावरील वैधानिक बंदी आणि गुन्हा नोंदविण्यापूर्वी प्राथमिक चौकशीची आवश्यकता नसल्याची तरतूद कायम राहिली आहे.

सरन्यायाधीश न्यायमूर्ती सूर्यकांत, न्यायमूर्ती जॉयमाल्या बागची आणि न्यायमूर्ती व्ही. मोहना यांच्या खंडपीठाने ही याचिका फेटाळली. २०१८ मधील दुरुस्त्यांना सर्वोच्च न्यायालयाच्या तीन न्यायाधीशांच्या खंडपीठाने २०२० मध्येच घटनात्मक मान्यता दिली असल्याचे न्यायालयाने निदर्शनास आणून दिले. त्यामुळे तोच मुद्दा पुन्हा तपासण्याचे कारण नसल्याचे न्यायालयाने स्पष्ट केले. २०१८ मध्ये काय बदल झाले? मार्च २०१८ मध्ये Subhash Kashinath Mahajan प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाने SC/ST कायद्यांतर्गत तात्काळ अटकेसंदर्भात काही प्रक्रियात्मक निर्बंध घातले होते. त्यानंतर संसदेत २०१८ मध्ये दुरुस्ती करून कलम १८-अ समाविष्ट करण्यात आले.



या तरतुदीनुसार SC/ST Act अंतर्गत FIR नोंदविण्यापूर्वी प्राथमिक चौकशीची आवश्यकता नाही तसेच अटकेसाठी पूर्वपरवानगीची अट लागू होत नाही.

याचबरोबर फौजदारी प्रक्रिया संहितेतील कलम ४३८ अंतर्गत अटकपूर्व जामिनाची तरतूद या कायद्याला लागू होणार नाही, अशी तरतूद करण्यात आली. याचिकाकर्त्यांचे काय आक्षेप होते? याचिकाकर्त्यांनी कलम १८-अमुळे नागरिकांच्या समानतेचा अधिकार, जीवन व वैयक्तिक स्वातंत्र्याच्या अधिकारावर परिणाम होत असल्याचा दावा केला होता. कायद्याचा कथित गैरवापर रोखण्यासाठी अतिरिक्त मार्गदर्शक तत्त्वे निश्चित करण्याची मागणीही करण्यात आली होती. मात्र सर्वोच्च न्यायालयाने २०१८ च्या दुरुस्तीची वैधता २०२० मध्येच कायम ठेवण्यात आल्याचे नमूद करत सदर मुद्दा पुन्हा उघडण्यास नकार दिला. न्यायालयाने कायद्याच्या कथित गैरवापराच्या प्रकरणांमध्ये उपलब्ध न्यायालयीन उपाययोजनांकडेही लक्ष वेधले. 'प्रथमदर्शनी गुन्हा' नसेल तर न्यायालयाचा दिलासा शक्य या निर्णयाचा अर्थ असा नाही की SC/ST Act अंतर्गत दाखल प्रत्येक प्रकरणात न्यायालयीन हस्तक्षेपाची शक्यता पूर्णपणे बंद झाली आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या आधीच्या भूमिकेनुसार, तक्रारीत प्रथमदर्शनी SC/ST Act अंतर्गत गुन्हा स्पष्टपणे दिसून येत नसेल, तर अटकपूर्व जामिनाच्या बंदीचा लाभ आपोआप लागू होत नाही. अलीकडील सुनावणीतही न्यायालयाने प्रथमदर्शनी प्रकरण बनते की नाही.

दुष्काळ, नापिकी आणि शेती कर्जाच्या चिंतेत शेतकऱ्याची आत्महत्या!

जन सम्राट टाईम्स

बोदवड। प्रतिनिधी: शेतकरी काशीनाथ मारोती बावस्कर (वय ४८) यांनी दुष्काळी परिस्थिती, नापिकी आणि शेती कर्जाच्या चिंतेत विषारी औषध प्राशन केल्याची घटना घडली. उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला. या घटनेमुळे बावस्कर कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला असून, शासनाने निकषांनुसार आत्महत्याग्रस्त कुटुंबाला तातडीने शासकीय मदत द्यावी, अशी मागणी त्यांच्या मुलींनी तहसीलदारांकडे अर्जाद्वारे केली आहे. काशीनाथ बावस्कर यांची येवती शिवारातील गट क्रमांक २८३ मध्ये शेती होती. यंदाच्या दुष्काळी परिस्थितीमुळे शेतीतून अपेक्षित उत्पन्न मिळणार नसल्याची चिंता त्यांना होती. त्यातच शेतीसाठी घेतलेल्या कर्जाची परतफेड कशी करावी, या विवंचनेत ते असल्याचे कुटुंबीयांनी सांगितले. याच पार्श्वभूमीवर रविवारी त्यांनी विषारी औषध प्राशन केले. त्यांना उपचारासाठी दाखल करण्यात आले; मात्र उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला. बावस्कर यांच्या पश्चात



तीन मुली आहेत. त्यापैकी एक मुलगी दिव्यांग आहे. त्यांच्या पत्नीचे यापूर्वीच निधन झाले आहे. त्यामुळे कुटुंबाचा मुख्य आधार हरपल्याने तीनही मुलींसमोर उदरनिर्वाह, शिक्षण आणि भविष्यातील आर्थिक गरजांचे मोठे आव्हान उभे राहिले आहे. या पार्श्वभूमीवर आरती काशीनाथ बावस्कर, मंगला काशीनाथ बावस्कर आणि लक्ष्मी काशीनाथ बावस्कर यांनी तहसीलदारांकडे अर्ज सादर केला आहे. दुष्काळ व नापिकीच्या परिस्थितीमुळे वडिलांनी आत्महत्या केल्याने शासनाच्या निकषांनुसार या प्रकरणाची चौकशी करून पात्रतेनुसार कुटुंबाला शासकीय आर्थिक मदत व इतर उपलब्ध योजनांचा लाभ द्यावा, अशी मागणी त्यांनी केली आहे. पुन्हा ऐरणीवर आला आहे. संबंधित यंत्रणेने प्रकरणाची चौकशी करून पीडित कुटुंबाला नियमानुसार मदत मिळवून देण्याची मागणी होत आहे. शेतकरी काशीनाथ मारोती बावस्कर (वय ४८) यांनी दुष्काळी परिस्थिती, नापिकी आणि शेती कर्जाच्या चिंतेत विषारी औषध प्राशन केल्याची घटना घडली. उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला. या घटनेमुळे बावस्कर कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला असून, शासनाने निकषांनुसार आत्महत्याग्रस्त कुटुंबाला तातडीने शासकीय मदत द्यावी, अशी मागणी त्यांच्या मुलींनी तहसीलदारांकडे अर्जाद्वारे केली आहे. काशीनाथ बावस्कर यांची येवती शिवारातील गट क्रमांक २८३ मध्ये शेती होती. यंदाच्या दुष्काळी परिस्थितीमुळे शेतीतून अपेक्षित उत्पन्न मिळणार नसल्याची चिंता त्यांना होती. त्यातच शेतीसाठी घेतलेल्या कर्जाची परतफेड कशी करावी.

लाडकुबाई प्राथमिक विद्यामंदिरात कर्मवीर तात्यासाहेबांच्या 25 व्या पुण्यस्मरण

विविध नाविन्यपूर्ण स्पर्धांचे आयोजन; विद्यार्थ्यांच्या कलागुणांना मिळणार व्यासपीठ

जन सम्राट टाईम्स

भडगाव। प्रतिनिधी: येथील लाडकुबाई प्राथमिक विद्यामंदिरात कर्मवीर तात्यासाहेबांच्या २५ व्या पुण्यस्मरण सप्ताहाचे उद्घाटन उत्साहपूर्ण वातावरणात करण्यात आले. विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळावा, त्यांच्यातील सर्जनशीलता, आत्मविश्वास, नेतृत्वगुण तसेच क्रीडाभावना विकसित व्हावी, या उद्देशाने सप्ताहभर विविध नाविन्यपूर्ण, मनोरंजक व ज्ञानवर्धक स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. पुण्यस्मरण सप्ताहाच्या उद्घाटनप्रसंगी विद्यार्थ्यांसाठी संगीत खुर्ची स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी या स्पर्धेत उत्स्फूर्त सहभाग नोंदवत आनंद व्यक्त केला. स्पर्धेत कावेरी प्रफुल्ल पाटील हिने प्रथम क्रमांक, तर सकीना अहमद खान हिने द्वितीय क्रमांक पटकावला. कर्मवीर तात्यासाहेबांच्या कार्याला उजाळा यावेळी शाळेचे मुख्याध्यापक कमलेश शिंदे यांनी कर्मवीर तात्यासाहेबांच्या आठवणींना उजाळा देत त्यांच्या प्रेरणादायी कार्याचा गौरव केला. शिक्षणाच्या माध्यमातून समाजातील सर्वसामान्य घटकांपर्यंत ज्ञानाची गंगा पोहोचविण्यासाठी तात्यासाहेबांनी केलेल्या कार्याची माहिती त्यांनी विद्यार्थ्यांना दिली. शिक्षण क्षेत्राच्या विकासासाठी तात्यासाहेबांनी दिलेले योगदान, त्यांची दूरदृष्टी, शैक्षणिक कार्याची तळमळ आणि समाजहिताची भूमिका यांचे महत्त्व त्यांनी



अधोरेखित केले. तात्यासाहेबांचे विचार आणि कार्य विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी असून, त्यातून प्रेरणा घेऊन विद्यार्थ्यांनी शिक्षण, संस्कार आणि सामाजिक बांधिलकी जोपासावी, असे आवाहनही त्यांनी केले. सप्ताहभर विविध स्पर्धांचे आयोजन पुण्यस्मरण सप्ताहात चित्रकला, रांगोळी, निबंध, भाषण, लिंबू-चमचा, गोणपाट स्पर्धा यांसह विविध मनोरंजक व ज्ञानवर्धक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या सुप्तगुणांना व्यासपीठ मिळणार असून, त्यांच्या सर्वांगीण विकासाला चालना मिळणार आहे. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिक्षक ज्ञानेश्वर गांगुर्डे यांनी केले, तर अनंत हिरे यांनी फलक लेखनाची जबाबदारी पार पाडली. यावेळी शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष ललित पाटील, तसेच दिनेश बोरसे, दीपक पाटील, मनोज माळी, प्रवीण पाटील यांच्यासह परिसरातील प्रतिष्ठित नागरिक उपस्थित होते. शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे योगदान कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी संगीता शेलार, सुनीता देवरे, अनिता सैंदाणे, अनंत हिरे, ज्ञानेश्वर गांगुर्डे, हर्षल पाटील, किरण पाटील, सुयोग पाटील आणि सचिन पाटील यांनी परिश्रम घेतले. तसेच शाळेतील शिक्षकेतर कर्मचारी चंद्रकांत पाटील यांचे मोलाचे सहकार्य लाभले. विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग, शिक्षकांचे मार्गदर्शन आणि विविध नाविन्यपूर्ण उपक्रमांमुळे कर्मवीर तात्यासाहेबांचा २५ वा पुण्यस्मरण सप्ताह ज्ञान, संस्कार, कला आणि क्रीडा यांचा सुंदर संगम ठरत आहेलाडकुबाई प्राथमिक विद्यामंदिरात कर्मवीर तात्यासाहेबांच्या २५ व्या पुण्यस्मरण सप्ताहाचे उद्घाटन उत्साहपूर्ण वातावरणात करण्यात आले. विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळावा, त्यांच्यातील सर्जनशीलता, आत्मविश्वास, नेतृत्वगुण तसेच क्रीडाभावना विकसित व्हावी, या उद्देशाने सप्ताहभर विविध नाविन्यपूर्ण, मनोरंजक व ज्ञानवर्धक स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. पुण्यस्मरण सप्ताहाच्या उद्घाटनप्रसंगी विद्यार्थ्यांसाठी संगीत खुर्ची स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी या स्पर्धेत उत्स्फूर्त सहभाग नोंदवत आनंद व्यक्त केला. स्पर्धेत कावेरी प्रफुल्ल पाटील हिने प्रथम क्रमांक, तर सकीना अहमद खान हिने द्वितीय क्रमांक पटकावला.

किन्ही येथे विजय भाऊ निकम यांची शाळा व्यवस्थापन समितीच्या उपाध्यक्षपदी निवड



जन सम्राट टाईम्स

किन्ही, ता. सोयगाव| प्रतिनिधी: किन्ही : वंचित बहुजन आघाडीचे युवा कार्यकर्ते विजय भाऊ निकम यांची किन्ही, ता. सोयगाव, जि. छत्रपती संभाजीनगर येथील CBSE जिल्हा परिषद आदर्श शाळेच्या शाळा व्यवस्थापन समितीच्या उपाध्यक्षपदी एकमताने निवड करण्यात आली. त्यांच्या निवडीमुळे किन्ही गावासह परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. निवडीनंतर आदर्श शाळा किन्ही येथे मुख्याध्यापक व शिक्षकवृंदांच्या हस्ते विजय भाऊ निकम यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी गावातील प्रतिष्ठित नागरिक, शिक्षक, पालक तसेच वंचित बहुजन आघाडीचे तालुकाध्यक्ष गणेश सोनवणे यांच्यासह पक्षाचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. शाळेच्या सर्वांगीण विकासासाठी प्रयत्न करणार सत्काराला उत्तर देताना विजय भाऊ निकम म्हणाले, "माझ्यावर सोपवलेल्या जबाबदारीला मी पूर्ण न्याय देईन. आदर्श शाळा किन्हीचा शैक्षणिक दर्जा आणखी उंचावण्यासाठी, गोरगरीब विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण मिळवून देण्यासाठी आणि शाळेच्या सर्वांगीण विकासासाठी मी सातत्याने प्रयत्नशील राहीन." त्यांच्या निवडीबद्दल वंचित बहुजन आघाडीचे पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच किन्ही ग्रामस्थांच्या वतीने अभिनंदन करण्यात आले.